कृषीवल
रायगड, मंगळवार, दि. २६ ऑगस्ट २०२५
किंमत ४ ₹

## शुभांशु शुक्लांचे जल्लोषात स्वागत

**लखनऊ :** भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर ऐतिहासिक २० दिवसांची मोहीम पूर्ण करून लखनऊत परतल्यानंतर त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. भारताचे पहिले अंतराळवीर म्हणून आयएसएसवर पोहोचलेल्या शुभांशु यांनी ॲक्सिऑम मिशन ४ अंतर्गत २६ जूनला नासाच्या केनेडी अंतराळ केंद्रातून उड्डाण केले होते. इस्रो आणि ॲक्सिऑम स्पेस यांच्या सहकार्याने आयोजित या मोहिमेने भारताच्या अंतराळ संशोधनात नवा अध्याय लिहिला आहे. दरम्यान, शुभांशु यांचा सत्कार करण्यासाठी राज्य सरकारने गोमतीनगर येथील सिटी मॉन्टेसरी स्कूलमध्ये भव्य समारंभ आयोजित केला होता.




# परदेशवारी शेतकऱ्यांना भारी

**धम्मशील सावंत**
**। पाली/बेणसे ।**

**महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतून मिळून जवळपास २०० शेतकऱ्यांची परदेश अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. मात्र, शासनाने दिलेल्या मर्यादित अनुदानानंतर उर्वरित लाखो रुपयांचा बोजा थेट शेतकऱ्यांच्या खिशावर टाकण्यात आला आहे. या अवाजवी आकारणीविरोधात शेतकरी संतापले असून, शासनाने तातडीने खर्चाचे पुनर्मूल्यांकन करावे, अशी जोरदार मागणी केली जात आहे.**

या दौऱ्यासाठी रायगड जिल्ह्यातून ८ शेतकऱ्यांचे अर्ज कृषी विभागाला आले होते. प्रत्येक जिल्ह्याला पाचचा लक्षांक दिला आहे. त्यामुळे बाकीचे तीन वेटिंगवर असणार आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना विविध प्रगत देशांतील विकसित आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती होण्यासाठी ‘शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे’ ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत युरोप, इस्त्राईल, जपान, मलेशिया, चीन, दक्षिण कोरिया अशा प्रगत देशांत राज्यातील शेतकऱ्यांना नेऊन तेथील शेती तंत्रज्ञान अवगत करून घेण्याचा शासनाचा हेतू आहे. यामधील कोणताही एक दौरा शेतकऱ्यांनी निवडायचा आहे. मात्र, वैयक्तिक दौरा या दौऱ्यापेक्षा स्वस्त पडत असल्याचे शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे. कारण, शासनाकडून प्रत्येक दौऱ्यासाठी शेतकऱ्यांना अवघे १ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्येक दौऱ्यात शेतकऱ्यांवर प्रचंड आर्थिक भुर्दंड पडणार आहे.

त्यामुळे शासनाने या दौऱ्याचा ५० टक्के खर्च उचलावा. किंवा शेतकऱ्यांचा हिस्सा १ लाख रुपयांपर्यंतच मर्यादित ठेवावा. त्यापलीकडील सर्व खर्च शासनानेच करावा, या प्रमुख मागण्या शेतकऱ्यांकडून होत आहेत. अन्यथा दौऱ्यांचा लाभ केवळ निवडक सधन शेतकऱ्यांपुरताच मर्यादित राहील, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

### दौऱ्याचा मूळ उद्देश

शेतमालाची निर्यात, कृषी मालाचे पणन व बाजारपेठेतील मागणी, कृषी मालप्रक्रिया याबरोबरच त्या देशांमध्ये उपयोगात येत असलेले अद्ययावत तंत्रज्ञान अवगत करून त्याचा वापर राज्यातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतीमध्ये करणे, विविध देशांनी विकसित केलेले शेती तंत्रज्ञान व अनुषंगिक बाबी यांची माहिती त्या देशातील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करून तसेच क्षेत्रीय भेटी, संबंधित संस्थांना भेटी इत्यादीद्वारे शेतकऱ्यांचे ज्ञान आणि क्षमता उंचावण्याकरिता कृषी विभागाकडून राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे राबविण्यात येत आहेत.



**खर्चाचे पुनर्मूल्यांकन करण्याची जोरदार मागणी**

### दौऱ्याचा खर्च

| दौरा | प्रतिशेतकरी खर्च | शेतकरी हिस्सा |
|---|---|---|
| युरोप | ४,१८,९२५ | ३,१८,९२५ |
| इस्त्राईल | ३५४३५० | २,५४,३५० |
| जपान | ३,८८,९०१ | २,८८,९०१ |
| चीन | २,७१,१५६ | १,७१,१५६ |
| द. कोरिया | २,९८,८३० | १९८८३० |
| मलेशिया, व्हिएतनाम, फिलिपाईन्स – ३,१३,७३२ – २,१३,७३२ | | |

“ही योजना देशाचा पोशिंदा शेतकरी राजा याच्या प्रगतशील धोरण ठेवून केली का? असा प्रश्न या दौऱ्यामध्ये सहभागी असणाऱ्यांना पडला आहे. या योजनेत प्रतिशेतकरी अनुदान हे फक्त १ लाख रुपये दिले आहे. मात्र, प्रत्यक्षात यापेक्षा तिप्पट खर्च येणार आहे. परिणामी, शेतकऱ्यावर प्रचंड आर्थिक भुर्दंड बसला आहे. त्यामुळे लाखोंचा खर्च करून प्रदेश दौरा करण्यापेक्षा तीच रक्कम शेतीप्रयोजनार्थ वापरली तर वावगं काय? सुधारीत व सर्वसामान्य शेतकऱ्यांना परवडणारे परिपत्रक काढून इच्छुक प्रगतशील शेतकऱ्यांना परदेश दौरा काढून हे धोरण राबविले जावे.

– गणेश भगत, प्रयोगशील शेतकरी, चणेरा

## शेकाप नेते जयंत पाटील यांच्याकडून मदतीचा हात



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वादळी वाऱ्यामुळे किहीम येथील अभिषेकनाथ पेडणेकर यांच्या घरावर नारळाचे झाड कोसळले होते. त्यामुळे पेडणेकर यांच्या घराचे प्रचंड नुकसान झाले. मात्र, शासनाच्या एक पाऊल पुढे जात शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी नुकसानग्रस्तांना आर्थिक मदतीचा हात दिला. त्यामुळे पेडणेकर कुटुंबियांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

रायगड जिल्ह्यामध्ये मंगळवारी (दि.१९) अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीने जिल्ह्यात थैमान घातले होते. या पावसाने अलिबाग तालुक्यालादेखील झोडपून काढले होते. यावेळी किहीम येथील अभिषेकनाथ पेडणेकर यांच्या घरावर नारळाचे झाड पडले. त्यात त्यांच्या घराचे नुकसान झाल्याची माहिती शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांना मिळताच त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत पेडणेकर यांना आर्थिक मदत केली. त्यासाठी शेकापचे संदीप गायकवाड, उपसरपंच मिलिंद पडवळ, मनोज म्हात्रे यांचे सहकार्य लाभले.

## अनवर शेखचा मृतदेह सापडला

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

अंबा नदीत वाहून गेलेल्या नागोठणे मोहल्ल्यातील अनवर शेख यांचा मृतदेह अखेर सापडला आहे. त्यांचा मृतदेह अंबा नदीच्या खाडीत सांबरी गावाच्या पकटीजवळ असल्याची माहिती नागोठण्याच्या निसर्ग वन्यजीव संरक्षण संस्थेच्या टीमला मिळाली होती. त्यानंतर त्यांनी त्या ठिकाणी जाऊन अनवर यांचा मृतदेह छोट्या होडीत टाकून नागोठण्यात आणला. अनवर •> पान २ वर

## आंबेनळी, वरंध घाटावरील वाहतूक सुरु

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील आंबेनळी घाटातून अवजड वाहतूक पुन्हा सुरु करण्यात आली आहे. तसेच, वरंध घाटदेखील सर्व प्रकारच्या वाहनांसाठी खुला करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी यासंदर्भात आदेश जारी केले असून, अतिवृष्टीचे दिवस वगळता इतर सर्व दिवशी या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतुकीची परवानगी दिली जाणार आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वी मुसळधार पावसामुळे आणि भारतीय हवामान विभागाच्या हाय अलर्ट इशाऱ्यामुळे राजेवाडी ते वरंध घाट मार्ग पूर्णतः बंद करण्यात आला होता. तसेच, सुरक्षिततेच्या दृष्टीने आंबेनळी घाट मार्गावर अवजड वाहतुकीस पूर्ण बंदी घालण्यात आली होती. पावसाळ्यात ऑरेंज आणि रेड अलर्ट असताना हलक्या वाहनांनाही बंदी घालण्यात आली होती. याशिवाय रात्रीच्या वेळी सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक पूर्णतः थांबविण्यात आली होती. या बंदीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. आगामी गणेशोत्सव व सणासुदीच्या काळात या रस्त्यावरील वाहतूक सुरु करण्याची मागणी वारंवार स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांकडून केली जात होती.

दरम्यान, कार्यकारी अभियंता (कोकण), महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाने घाटरस्त्यावरील सुधारणा आणि मजबुतीकरणाची कामे पूर्ण केली आहेत. ढिगारे हटविणे, अडथळे दूर करणे आणि रस्ता प्रवासासाठी सुरक्षित बनविण्याची कामे पूर्ण झाल्यामुळे रस्ता •> पान २ वर

## माथेरान घाटात कारला अपघात



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान येथे पर्यटनासाठी आलेल्या मुंबई-कुर्ला येथील पर्यटकांच्या वाहनाला माथेरान घाटात अपघात झाला. दैव बलवत्तर म्हणून चौघे प्रवासी वाचले आहेत. माथेरान घाटातील पिटकर पॉइंट येथे रस्त्याचा अंदाज न आल्याने पर्यटकांची स्विफ्ट कार थेट २५ फूट खाली रस्त्यावर कोसळल्याचे सांगण्यात येत आहे. श्रीधर साळुंखे, सोहेल शेख, आकाश गायकवाड आणि अहमद खान असे अपघातग्रस्तांचे नाव आहे. •> पान २ वर

## शंभर टक्के नोकरीची लेखी हमी द्या

### शेकाप पुरोगामी युवक संघटनेची मागणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील वडखळ-डोलवी येथे तिसऱ्या टप्प्यातील जेएसडब्ल्यू प्रकल्पाच्या विस्तारीकरणासाठी लगबग सुरू झाली आहे. या प्रकल्पाचे शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने स्वागत करण्यात आले आहे. मात्र, प्रकल्प उभारत असताना स्थानिकांना शंभर टक्के कायम नोकरी मिळावी, याची लेखी हमी द्यावी, अशी मागणी शेकाप पुरोगामी युवक संघटना तालुका प्रमुख विक्रांत वार्डे यांनी केली आहे.

जेएसडब्ल्यू कंपनीच्या तिसऱ्या टप्प्यातील प्रकल्पाला सशर्त पाठिंबा दर्शविण्यात येत आहे. कंपनीने जनहिताच्या मागण्यांचा विचार करणे गरजेचे आहे. शंभर टक्के कायम नोकरीची हमी तोंडी न देता लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तोंडी आश्वासन देणारे अधिकारी बदलून गेल्यावर लिखित कराराने रोजगार सुरक्षित राहील. स्थानिकांना त्यांच्या शेत जमिनीच्या सुपिकतेची हमी, प्रदूषणामुळे आरोग्याला हानी न होण्याची हमी लिखित करार स्वरुपात द्यावी. जेएसडब्ल्यू कंपनीच्या रुग्णालयामध्ये तालुक्यातील रुग्णांना माफक दरात आणि प्रदूषण कार्यक्षेत्रात येणाऱ्या स्थानिक ग्रामपंचायतीमधील रुग्णांना मोफत उपचार मिळावा. कौशल्य, अथवा शैक्षणिक पात्रता असलेले कर्मचारी कंपनीत लागतील त्याची माहिती द्यावी. तसेच, स्थानिक तरुणांना प्रशिक्षण देण्यात यावे, अशी मागणी पुरोगामी युवक संघटना, अलिबाग तालुका प्रमुख विक्रांत वार्डे यांनी केली आहे.

### स्थानिकांना प्राधान्याची भूमिका

**शेतकरी, कष्टकरी व कामगार वर्गाबरोबच गोरगरीबांच्या हितासाठी, न्यायासाठी शेतकरी कामगार पक्षाने लढा दिला आहे. हे लढे यशस्वी देखील करून कष्टकरी, कामगार, वंचित घटकाला न्याय मिळून देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रकल्पांमध्ये स्थानिकांना प्राधान्याने रोजगार मिळावा हि शेकापची कायमच भूमिका राहिलेली आहे. शेकापने कायमच सर्वसामान्यांचा विचार केला आहे, अशी प्रतिक्रिया विक्रांत वार्डे यांनी दिली.**

**रायगड पोलिसांना आधुनिकतेचा आधार | खारपाडा, पाली या ठिकाणी दोन कॅमेरे**

## वाहतूक कोंडीवर ‘एआय’ची नजर



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवासाठी मुंबईतून कोकणात जाण्याची लगबग वाढली आहे. चाकरमानी मुंबई-गोवा महामार्गावरून कोकणाकडे निघाले आहेत. चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा, यासाठी रायगड पोलिसांनी आधुनिकेतचा आधार घेतला आहे. वाहतूक कोंडीवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्ह्यात खारपाडा आणि पाली या ठिकाणी दोन एआय सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांच्या मदतीने वाहनांच्या संख्येवर लक्ष ठेवून वाहतूक कोंडी सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न राहणार असल्याची माहिती वाहतूक पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी दिली.

गणरायाचे आगमन बुधवारी (दि.२७) होणार आहे. गणरायाच्या स्वागतासाठी आणि सजावटीसाठी चाकरमानी कोकणात निघाले आहेत. रायगड जिल्ह्यातील २२६ एसटी बसेस मुंबई व ठाणे येथील चाकरमान्यांना घेऊन कोकणात निघाल्या आहेत. तसेच, काही गणेशभक्त •> पान २ वर

## विद्यार्थ्यांचा पबमध्ये धिंगाणा

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पुण्यात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. अशातच एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशाला पबवाल्यांनी केराची टोपली दाखवल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे आता चिंता व्यक्त करण्यात येत आहे. राजा बहादूर मिलमधील ‘डी मोरा’ पबमध्ये रविवारी (दि.२४) रात्री फ्रेशर पार्टीदरम्यान अक्षरशः रणांगणाचे दृश्य पाहायला मिळाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, २१ वर्षांखालील वयोगटातील कॉलेजची मुले पुण्यातील ‘डी मोरा’ पबमध्ये रविवारी दारू पिऊन तुफान धिंगाणा घालत होती. बॉटलवर बॉटल उडवत, जोरदार डान्स करत पब अक्षरशः थरथरून गेले होते. गेल्या आठ दिवसांपासून पुण्यात अशा फ्रेशर पार्ट्यांची साखळी सुरू आहे. कॉलेजमधील १८ ते २० वर्षे वयोगटातील मुलांना खुलेआम दारू पुरवली जात आहे. यावरून पबवाल्यांना राजकीय छत्रछाया मिळतेय का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.






# मृतांच्या कुटुंबांना मदत मिळावी

## • शिवसेना ठाकरे पक्षाची महावितरणकडे मागणी



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील सावेले ग्रामपंचायतमधील साळोख वाडी येथील दोन आदिवासी व्यक्तींचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला आहे. तर, महावितरण कंपनीची विजेची वाहिनी जमिनीजवळ आल्याने तिला धक्का लागून सालवड येथील आठ वर्षाच्या बालकाचा मृत्यू झाला. या दोन्ही कुटुंबांना महावितरण कंपनीकडून आर्थिक मदत मिळावी यासाठी शिवसेना ठाकरे पक्षाकडून निवेदन देण्यात आले आहे. तसेच, कर्जत वीज बचाव संघर्ष समितीकडून देखील ही मागणी करण्यात आली आहे.

कर्जत तालुक्यात पावसाचा कहर सुरू असताना सावेले ग्राम पंचायतमधील साळोख वाडी येथे राहणारे रामचंद्र वाघमारे हे आपल्या घरच्या आवारात असलेल्या शेवग्याच्या शेंगा काढण्यासाठी झाडावर चढले. त्यावेळी तेथून वाहणाऱ्या वीज वाहिनीचा रामचंद्र वाघमारे, त्यांच्या सोबत असलेल्या पार्वती वाघमारे तसेच सुनीता वाघमारे यांना जोरदार धक्का बसला. त्या धक्क्यात रामचंद्र वाघमारे आणि पार्वती वाघमारे यांचा मृत्यू झाला आहे. तर, दोन दिवसांपूर्वी कळंबोली येथील वीज उप केंद्राच्या मुख्य वीज वाहिन्याच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना वीज वाहिनी जमिनीकडे झुकली होती.सालवड परिसरात सदर वीज वाहिनीचा येथील आठ वर्षाचा बालक शिव रूपेश भोसले याला स्पर्श झाला. त्या धक्क्यात त्याचा मृत्यू झाला. या दोन्ही घटनांतील दोषी असलेल्या महावितरण कंपनीवर सोमवारी (दि.२५) शिवसेना ठाकरे पक्षाने मोर्चा काढला.

शिवसेना ठाकरे पक्षाच्यावतीने उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत यांच्या नेतृत्वाखाली सालवड आणि साळोख येथील मृत्यूमुखी पडलेल्या बांधवांना महावितरण कडून भरपाई देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी शिवसेना ठाकरे पक्षाचे तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, तालुका संघटक बाबू घारे, जिल्हा संघटक भीमसेन बडेकर, कर्जत पंचायत समिती माजी उप सभापती पंढरीनाथ राऊत, उप तालुका प्रमुख बाजीराव दळवी, विभाग प्रमुख योगेश दाभाडे, पांडुरंग बागडे, कर्जत शहराचे माजी शहर प्रमुख संतोष पाटील, उप शहर प्रमुख कृष्णा जाधव तसेच प्रमोद सावंत,उप शहर प्रमुख विनोद पांडे जगन पायगुडे आदी सह नसरापूर ग्रामपंचायत मधील पप्पू पवार माजी सरपंच वैभव कडव आदी उपस्थित होते.

# मनोज जरांगेंचे वादळ रायगडात धडकणार

। खोपोली । प्रतिनिधी ।

मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या बांधवांना घेऊन शुक्रवारी (दि.२९) मुंबईत दाखल होणार आहेत. त्या आधी गुरूवारी (दि.२८) रात्री उशीरा ते खोपोलीत पोहचणार आहेत. त्यामुळे मनोज जरांगे यांच्या स्वागतासाठी रायगड जिल्ह्यातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. त्यानंतर मिळेल त्या वाहनानांनी आझाद मैदानावर आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी जायचे असल्याचे आवाहन मराठा समाज राज्य समन्वयक डॉ. सुनील पाटील यांनी केले आहे. येत्या २९ ऑगस्ट रोजी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या मराठा आरक्षणाच्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यातील सर्व सखल मराठा बांधवाकडून जोरदार तयारी सुरू आहे. त्याचवेळी स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडात मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील हे २८ ऑगस्टच्या रात्रीच्या सुमारास खोपोलीत येणार आहेत.

त्यामुळे मराठा समाज बांधवांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी २४ ऑगस्ट रोजी खोपोलीतील चंद्रविलास हॉलमध्ये बैठक पार पडली. यावेळी राज्य समन्वयक डॉ. सुनिल पाटील, राज्य समन्वयक विनोद साबळे, शंकरराव थोरवे, उत्तम भोईर, किरण हाडप, संकेत हाडप, राहुल गायकवाड तात्या रिठे, अमित यादव, केतन निकम, किशोर पाटील, योगेश मोरे, कमलाकर लबडे, सचिन पडवळ, समीर शिंदे, राकेश मराठे, प्रशांत थरकुडे आदी प्रमुखांसह मराठा समाज बांधव उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे चांधई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आहे, या मिळकतींचे मालक शरद श्रीनिवास पाटील व श्रीलेखा शरद पाटील यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर/प्लॉट नंबर | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ५५/३/ब | ००.१५.५० | ०-६२ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकत व त्यामधील घर या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ८ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २६ ऑगस्ट २०२५

ॲड. शरद आर. सावंत
बी. कॉम. एल. एल. बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग, विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

# शेकापच्यावतीने शहराची स्वच्छता




। अलिबाग । प्रतिनिधी ।

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शेकाप शहर महिला आघाडीच्यावतीने अलिबाग शहरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली हे अभियान राबविण्यात आले. या अभियानाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून शहरातील कचरा गोळा करून त्याची योग्य पद्धततीने विल्हेवाट लावण्यात आली.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने शहरातील नागरिकांमध्ये स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून शेकापच्या महिला शहर आघाडीच्यावतीने स्वच्छता मोहिम राबविली जात आहे. ही परंपरा आजही जपण्याचे काम शेकापच्या माध्यमातून करण्यात आले आहे. अलिबाग शहरातील भाजी व मासळी बाजारपेठ परिसर झाडूने साफ करून तेथील कचरा गोळा करून तो कचरा भूमीत टाकण्यात आला. यावेळी ॲड. मानसी म्हात्रे यांनी स्वच्छतेचे महत्व सांगितले. या उपक्रमात शेकाप शहर सोशल मिडीया प्रमुख संजना कीर, महिला आघाडी प्रमुख ॲड. निलम हजारे, उपाध्यक्ष अश्वीनी ठोसर, वासंती मुकादम, आदी पदाधिकाऱ्यांसह भाजी व मासळी विक्रेत्या, नगरपरिषदेच्या साफ सफाई करणाऱ्या महिलांनीदेखील सहभाग घेतला होता.

# मुरूड पोलिसांचा चोख बंदोबस्त

। मुरूड-जंजिरा । प्रतिनिधी ।

मुरुड शहरात दिवसेंदिवस दुचाकींची संख्या वाढत आहे. त्यात काही दुचाकीचालक बाजारपेठेतील रस्तावर कुठेही बिंधास्तपणे गाडी पार्किंग करतात. त्यामुळे त्याठिकाणी खरेदीला येणाऱ्यांना रस्त्यावरून चालताना या दुचाकींचा मोठा अडथळा निर्माण होतो. तसेच, वाहतुक कोंडीचा देखील प्रश्न उद्‌भवतो. यावेळी देखील वाहतूकीचे तिन तेरा वाजणार की काय, असे गणेशभक्तांना वाटत होते. परंतु, मुरुडचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी एक दिशा मार्ग अवलंबून त्याठिकाणी चोख बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे शहरातील मुख्य बाजारपेठेत कुठेही वाहतूक कोंडी व गर्दी दिसून आली नाही.

# महाडमधील खड्ड्यांत ‘जलतरण’ आंदोलन



। महाड । प्रतिनिधी ।

महाड शहरातील रस्त्यांवर पसरलेल्या खड्ड्यांच्या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षातर्फे सोमवारी (दि.२५) अनोखे आंदोलन करण्यात आले. कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष खड्ड्यात लोळत आणि जलतरण स्पर्धा घेत नगरपरिषद प्रशासनाचा निषेध नोंदवला. विशेष म्हणजे, आंदोलनातील विजेत्या जलतरणपटूंना बक्षिसे देऊन आंदोलन रंगतदार करण्यात आले.

गणेशोत्सवाच्या तोंडावर रस्त्यांची झालेली दुरवस्था, खड्ड्यांचे साम्राज्य आणि नुकत्याच केलेल्या कंत्राटी कामाचा निकृष्ट दर्जा यावर नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. दोन महिन्यांपूर्वी लाखोंच्या खर्चाने केलेले खड्डे बुजवण्याचे हे काम पावसात पूर्णपणे उखडून गेले. परिणामी, सणासुदीत नागरिक आणि गणेशभक्तांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. आंदोलनादरम्यान प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी झाली. दखल न घेतल्यास अधिक तीव्र आंदोलन करू, असा इशारा देखील राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाच्यावतीने देण्यात आला आहे. या आंदोलनप्रसंगी शहर अध्यक्ष पराग वडके यांनी प्रशासनातील मनमानीवर तीव्र टीका केली. ‘स्वच्छ महाड, सुंदर महाड’ ही मोहिम फक्त कागदावर दिसत असून प्रत्यक्षात मात्र शहराचे विद्रूपीकरण सुरू आहे. जबाबदार अधिकाऱ्यांनी त्वरित राजीनामे द्यावेत, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

या आंदोलनात रायगड जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण, सरचिटणीस श्रीहर्ष कांबळे, जिल्हा सदस्य अनयत खान, संघटक अझहर धनसे, महाड शहर अध्यक्ष पराग वडके, तालुकाध्यक्ष संदीप सकपाळ, विधानसभा अध्यक्ष मुदसिर पटेल, तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रेयोमण्ड पटेल यांचेकडून खरेदी घेणेचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मौजे बोरघर, ता. अलिबाग येथील :-**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हेक्टर आर. चौरस मिटर | आकार रू.पै. |
|---|---|---|
| २३१ | ०-८१-०० | १.१० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- २६/०८/२०२५

ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे
''अन्नपूर्णा'', मु. पो. धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड.

# कोंडी सोडविण्यासाठी पोलिसांचे शर्थीचे प्रयत्न



। कोलाड । प्रतिनिधी ।

गणेशोत्सवानिमित्त कोकणात निघालेल्या चाकरमान्यांमुळे मुंबई-गोवा महामार्गावर प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. परिणामी प्रवासी वर्गासह स्थानिक नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.त्यामुळे ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रायगड पोलिसांकडून शर्थिचे प्रयत्न सुरु आहेत.

गणेशोत्सव हा सण मोठ्या आनंदात साजरा केला जात असुन हा सण साजरा करण्यासाठी कोकणातील आपल्या गावी मुंबई, पुणे, सुरत व देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो कोकणवासी येत असतात. त्यातच रविवारी (दि.२४) सुट्टी असल्यामुळे लाखो कोकणवासी मुंबई-गोवा महामार्गावरुन एसटी बस, दुचाकी, चारचाकी, रिक्षांसह इतर वाहनांनी गावाला निघाले. त्यामुळे या महामार्गावरील नागोठणे, कोलाड, इंदापूर व माणगाव येथे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दरम्यान, कोकणवासियांचा प्रवास सुखकर व्हावा व येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांना कोणताही त्रास होऊ नये म्हणून ठिकठिकाणी रायगड पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. त्यासाठी उपविभागीय पोलीस, पोलीस निरीक्षक, उप निरीक्षक व अंमलदार दिवसरात्र काम करीत असुन अनधिकृत पार्किंग व वाहतूकीचे नियम तोडणाऱ्यांवर करडी नजर ठेवून आहेत.

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे आंबेपूर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. उमेश कृष्णा पाटील रा. हनुमान गल्ली, ९६/१०, केशव वाणी चाळ, व्ही. एन. पुरव मार्ग, चुनाभट्टी-पूर्व, सायन, मुंबई ४०००२२ यांच्या नांवे असलेली मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे व तसा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | नगर भूमापन क्र. चौ.मी. | हि.नं. | क्षेत्र | धारणाधिकार |
|---|---|---|---|---|
| १. आंबेपूर ता. अलिबाग | ४२१ | | ३०० | क |
| वर नमूद मिळकतीमधील मौजे आंबेपूर, ग्रामपंचायत आंबेपूर, घर नं. ४७२ ची घर मिळकत | | | | |
| २. आंबेपूर ता. अलिबाग | ४२२ | | ३०० | क |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून पंधरा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २५/०८/२०२५

सही/-
सौ. ज्योती प्रभाकर पाटील
रा. फ्लॅट नं. ३९, ६ वा मजला,
इंद्रप्रसाद को.ऑप.हौ.सोसा.
ए.जे. मार्ग, टीचर्स कॉलनीजवळ,
बांद्रा-पूर्व, मुंबई ४०० ०५१
मो.नं. ९२२३९०११३०

पान १ वरुन

## अनवर शेखचा मृतदेह सापडला

यांचा मृतदेह पाहताच त्यांच्या नातेवाईकांनी एकच हंबरडा फोडला.

नागोठणे मोहल्ल्यातील ५७ वर्षीय अनवर शेख हे शनिवारी (दि.२३) नागोठण्यातील जुन्या पुलावरून जात असताना पाय घसरून अंबा नदीच्या पात्रात पडून वाहून गेले होते. त्यांची शोधमोहीम सह्याद्री वन्यजीव संरक्षण संस्थेच्या टीमकडून संध्याकाळपर्यंत राबविण्यात आली होती. मात्र, अनवर शेख सापडले नव्हते. दरम्यान, निसर्ग वन्यजीव संवर्धन संस्था रायगडच्या नागोठणे टीमला त्यांचा मृतदेह अंबा नदीच्या खाडीत सांबरी गावाच्या पकटीजवळ असल्याची माहिती मिळाली. त्यांनी घटनास्थळी जाऊन मृतदेह एका छोट्या होडीत टाकून नागोठण्यात आणला. त्यांचा मृतदेह पाहताच त्यांच्या नातेवाईकांनी एकच हंबरडा फोडला. अनवर शेख यांचा मृतदेह बाहेर काढण्यासाठी गेलेल्या टीममध्ये एनव्हीआरएसएस संस्थेचे नागोठणे अध्यक्ष प्रथमेश कोळी, सदस्य प्रणाल शिर्के, वसंत डोलकर, नवनीत मोकल, साहिल राणे, सनिस मिणमिणे, रोहित पाटील, स्वागत पारंगे, विनय पारंगे, कल्पेश बडे, नीरज बडे व अखिल शेलार यांचा समावेश होता.

## आंबेनळी, वरंध घाटावरील वाहतूक सुरु

पुन्हा सुरु करण्याची मागणी करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी महाड यांच्या अहवालाचा अभ्यास करून जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी हा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आंबेनळी आणि वरंध घाट मार्ग आता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी खुला करण्यात आला आहे. मात्र, अतिवृष्टीचा इशारा असलेल्या दिवसांत वरंध घाट रस्ता पूर्णतः बंद ठेवला जाईल. अशा वेळी स्थानिक पोलीस प्रशासनाने पुरेसा बंदोबस्त ठेवावा, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

## माथेरान घाटात कारला अपघात

मुंबई-कुर्ला येथील चार प्रवासी आपली मारुती स्विफ्ट कार घेऊन माथेरानमध्ये आले होते. नेरळ-माथेरान घाटात त्यांची कार पिटकर पॉइंट येथे वळणावर असलेला तीव्र चढाव लक्षात घेता चालकाने गाडीची स्टिअरिंग फिरवली. मात्र, त्या चालकाला ते स्टेअरिंग पुन्हा सरळ करता आले नाही. त्यानंतर त्यांची गाडी थेट २५ फूट खोल खाली असलेल्या रस्त्यावर येऊन आढळली. हा अपघाता इतका जबरदस्त होता की गाडीमध्ये कोणीही प्रवासी वाचले नसतील, असे प्रत्यक्षदर्शींना वाटत होते. परंतु, दैव बलवत्तर म्हणून चौघेजण बचावले. दरम्यान, नेरळ-माथेरान टॅक्सी संघटनेच्या चालकांनी गाडीत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढले. त्यांनंतर त्यांना तात्काळ खासगी दवाखान्यात उपचारासाठी पाठवून दिले. चारही प्रवाशांवर उपचार करण्यात आले असून, एक प्रवासी गंभीर जखमी असल्याची माहिती समोर आली आहे. नेरळ पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून, दैव बलवत्तर म्हणून चौघे प्रवासी वाचले आहेत. वळणावरील रस्त्यावरून त्यांचे वाहन खालच्या रस्त्यावर कोसळूनदेखील जीवितहानी झाली नसल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. माथेरान घाटातील या पिटकर पॉइंटवरील मागील एका महिन्यातील हा तिसरा अपघात आहे.

## वाहतूक कोंडीवर ‘एआय’ची नजर

खासगी वाहनाने निघाले आहेत. दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गावरून जाणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास सुखकर व्हावा, म्हणून रायगड पोलिसांनी आधुनिक पद्धतीचा अवलंब केला आहे. खारपाडा व पाली या ठिकाणी दोन एआय सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. या कॅमेऱ्यांच्या मदतीने मुंबई मार्गाने येणाऱ्या वाहनांच्या संख्येवर नजर ठेवली जाणार आहे. त्यानुसार पुढील प्रवासात असलेल्या भक्तांना प्रवासात अडथळा होऊ नये, यासाठी नियोजन केले जाणार आहे.

# संतप्त ठेकेदार आंदोलनाच्या तयारीत

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण-पनवेलमधील विविध शासकीय कामे केलेल्या ठेकेदारांचे फडणवीस सरकारने १२०० कोटी रुपये थकविले आहेत. तीन-चार वर्षांपासून कोट्यवधींचे बीले थकविल्याने ठेकेदार मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. वेळेत बीले अदा न केल्यास ठेकेदारांसमोर आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक राहिलेला नसल्याने आता कोट्यवधींच्या थकित बिलांच्या वसुलीसाठी उरण-पनवेल येथील संतप्त झालेल्या ठेकेदारांनी राज्य सरकार विरोधात आंदोलनाची तयारी सुरू केली आहे.

राज्याची आर्थिक स्थिती डबघाईस आली असल्याने राज्य सरकारने विविध विकास कामे करून घेतलेल्या ठेकेदारांची मागील तीन-चार वर्षांपासून ८९ हजार कोटी रुपये रुपयांची बिले थकविली आहेत. त्यामध्ये उरण-पनवेल येथील शेकडो ठेकेदारांचीही विविध विकासकामांचे सरकारने सुमारे १२०० कोटी रुपये थकविले आहेत. त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएम आरडीए आणि इतर विविध शासकीय योजनांच्या विकास कामांचा समावेश आहे. मागील विधानसभा निवडणुकीआधी शासनाने भरमसाठ कामे काढली. ठेकेदारांनी दागदागिने विकुन, व्याजाने पैसे काढून प्रसंगी पदरचे पैसे खर्च करून वेळेत कामे केली. यादरम्यान काही राजकीय पुढारी, नेते व लोकप्रतिनिधींनी विशेषता निवडणुकीच्या काळात ठेकेदारांशी गोड बोलुन टक्केवारी घेऊन हजारो कोटींची विकासकामे करुन घेतली आणि निवडणुकीत राजकीय लाभ उठवला. मात्र, ठेकेदारांची कोट्यवधींचे केलेल्या कामांची बिले मिळाली नाहीत. या दरम्यान राज्याचे अर्थमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचीही भेट घेऊन ठेकेदारांनी व्यथा मांडल्या. मात्र, राज्याच्या तिजोरीतच खड्ड्यात असल्याने ‘आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार’ असे सांगून त्यांनीही हात वर केले असल्याचा आरोप उरण-पनवेल परिसरातील संतप्त ठेकेदारांनी केला आहे. त्यामुळे वारंवार व्यथा मांडूनही दखल घेतली जात नसल्याने उरण-पनवेल परिसरातील संतप्त ठेकेदारही आंदोलनाच्या तयारीला लागले असल्याचे ठेकेदाराकडून सांगण्यात येत आहे.

**जाहीर नोटीस**
**(हक्कसोड पत्राबाबत)**

सिडको/भूसंपादन/१४२_NM_B/२०२५/२८५३ — दिनांक : १३.०८.२०२५

जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन), सिडको यांचेमार्फत मुंबई नवी मुंबई प्रकल्पाकरीता मौजे करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिनीचा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ नुसार व २२.५ टक्के विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत जमीनधारकांच्या ऐच्छिक संमतीने अंतिम संमती निवाडा घोषित केला आहे. त्यानुसार सिडको महामंडळाच्या स्तरावर संगणकीय सोडतीद्वारे पात्रताधारकांस भूखंड इरादित करण्यात आला आहे व इरादापत्र निर्गमित करण्यात आले आहे. संपादित जमीन व इरादित भूखंडाचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| संचिका क्रमांक | निवाडा क्रमांक | सर्व्हे नंबर /हिस्सा नंबर | संपादित क्षेत्र (हे.आर) | भूखंड पात्रता (चौ.मी) | जमीनधारक | इरादित भूखंडाचा तपशिल: नोड | सेक्टर क्रमांक | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संचिका क्र.१४२/_NM_B | करंजाडे प्रकरण क्र.३२ दि. २१.११.२०२१ | ६७/४अ पै<br>६७/४ब पै<br>६७/५<br>६७/६ पै | ४-६४-००<br>३-४१-००<br>०-६७-००<br>०-८२-०० | १५०३० | १) इस्माईल ईब्राहिम धारीवाला,<br>२) अजीज इस्माईल धारीवाला,<br>३) इब्राहीम ईस्माईल धारीवाला,<br>४) तसनीम इब्राहीम धारीवाला,<br>५) नफिसा शब्बीर जामनगरवाला,<br>६) याहया इब्राहीम धारीवाला,<br>७) सारा बद्रुद्दीन धारीवाला उर्फ सारा मोईज उनवाला,<br>८) झकीया बद्रुद्दीन धारीवाला,<br>९) कुतुब बद्रुद्दीन धारीवाला<br>१०) मोहसिन इब्राहीम धारीवाला | पुष्पक नोड | २९ | ०३ | १५०३० चौ.मी. |

०२. नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) नियमावली, २००८ च्या नियमावली १० अ मधील तरतुदीनुसार भूखंडधारकांनी इरादित भूखंडातील त्यांच्या हिस्स्याचे क्षेत्र नोंदणीकृत हक्कसोड पत्राद्वारे हस्तांतरित केले आहेत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

| नोंदणीकृत हक्कसोड पत्र क्रमांक व दिनांक | हक्कसोड पत्र लिहून देणारे | हक्कसोड पत्र लिहून घेणारे | हक्कसोड पत्रानंतर पात्र भूखंडधारकांची नावे | भूखंडाचा तपशील |
|---|---|---|---|---|
| पवल २-४८७८-२०२४, दि. ०६.०३.२०२४ | १) याहया इब्राहीम धारीवाला,<br>२) मयत झकीया बद्रुदिन धारीवाला यांचे वारस<br>(२/१) सारा बद्रुद्दीन धारीवाला उर्फ सारा मोईज उनवाला,<br>(२/२) कुतुब बद्रुद्दीन धारीवाला<br>३) सारा बद्रुद्दीन धारीवाला उर्फ सारा मोईज उनवाला<br>४) कुतुब बद्रुद्दीन धारीवाला<br>५) मोहसिन इब्राहीम धारीवाला | १) अजीज इस्माईल धारीवाला<br>२) इब्राहीम ईस्माईल धारीवाला | १) अजीज इस्माईल धारीवाला<br>२) इब्राहीम ईस्माईल धारीवाला<br>३) तसनीम इब्राहीम धारीवाला<br>४) नफिसा शब्बीर जामनगरवाला | सेक्टर-२९ भूखंड क्र.०३ क्षेत्र-१५०३० चौ.मी. |

०३. नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) नियमावली, २००८ च्या नियमावली १०अ मधील तरतुदीनुसार प्रस्तुत नोंदणीकृत हक्कसोड पत्राबाबत हरकत अथवा तक्रार असल्यास, त्याबाबत बाधीत व्यक्तींनी त्यांची लेखी हरकत अथवा तक्रार सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह, सदर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० (तीस) दिवसांच्या आत मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात दाखल करावी. तसेच लेखी हरकत अथवा तक्रार दाखल करणाऱ्या व्यक्तींनी, हरकत अथवा तक्रार दाखल केल्याच्या दिनांकापासून ६० (साठ) दिवसांच्या आत सदर हरकत व तक्रार यांच्या पृष्ठ्यर्थ सक्षम न्यायालयाने पारित केलेल्या अंतरित अथवा अंतिम आदेशाच्या प्रमाणित प्रति सादर कराव्यात.
०४.सदर प्रकरणी विहीत कालावधीमध्ये व वाजवी पुरावा असणारी लेखी हरकत अथवा तक्रार प्राप्त न झाल्यास, सदर नोंदणीकृत हक्कसोड पत्रांच्या अनुषंगाने सिडको महामंडळाच्या स्तरावर पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.
०५.सदर जाहीर नोटीस स्थानिक वर्तमानपत्रासह ग्रामपंचायत करंजाडे, तलाठी करंजाडे, तहसिलदार पनवेल व सिडको कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सही/-
(संजय शं.जाधव)
अपर जिल्हाधिकारी तथा
मुख्य भूमि व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

## निवडक



### विभागीय चिटणीसपदी सुधीर थळे

**अलिबाग :** धेरंड-शहापूर येथील शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते, अलिबाग पंचायत समितीचे माजी सदस्य सुधीर थळे यांची विभागीय चिटणीस म्हणून निवड करण्यात आली आहे. विभागीय चिटणीसपदाचे नियुक्तीपत्र तालुका चिटणीस सुरेश घरत यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य अनिल पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते अमरनाथ पाटील, विलास म्हात्रे, दिगंबर म्हात्रे, अजित भगत, अलिबाग तालुका युवक संघटना अध्यक्ष विक्रांत वार्डे, तालुका उपाध्यक्ष सूरज म्हात्रे, ॲड. शोधन ठाकरे, प्रमोद घासे, विजय पाटील आदींसह शेकापचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शेतकरी कामगार पक्षामध्ये निष्ठेला फार मोठे महत्त्व आहे. अनेक वर्षे पक्षाची निष्ठेने सेवा करणारे, संघटन वाढविणारे आणि पक्षहित जपणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान राखणे, हीच शेकापची परंपरा आहे. या परंपरेला अनुसरून निष्ठावंत ज्येष्ठ कार्यकर्ते सुधीर थळे यांची शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी शहापूर विभागाचे विभागीय चिटणीस म्हणून नियुक्ती केली आहे. या नियुक्तीमुळे विभागातील सर्व कार्यकर्त्यांमध्ये समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुधीर थळे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना विभागीय चिटणीसपदाचे पत्र देण्यात आले.



### शेकापच्या तालुका सहचिटणीसपदी दशरथ गायकर

**रसायनी :** रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एम आयडीसी परिसरातील कासप येथील दशरथ अर्जुन कदम यांची माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या पनवेल तालुका सहचिटणिसपदी नियुक्ती करण्यात आली. दशरथ गायकर यांचा जनसंपर्क, पक्षवाढीसाठी योगदान पाहता त्यांची सहचिटणिसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीनंतर सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दरम्यान, पक्षश्रेष्ठींनी आपल्यावर विश्वास ठेवून जी जबाबदारी दिली आहे, ती यशस्वीपणे पार पाडणार, असा विश्वास गायकर यांनी बोलून दाखविला.



### सचिन घाडींकडून स्वच्छता मोहीम

**सोगाव :** आगामी काळात मोठ्या प्रमाणात येणाऱ्या गणेशोत्सव, नवरात्री, दिवाळी आदी सणांच्या पार्श्वभूमीवर मुनवली, सोगाव परिसरात रस्त्याच्या दुतर्फा असलेले गवत व इतर प्रकारची स्वच्छता मोहीम मापगाव ग्रामपंचायतीच्या सहकार्याने राबविल्यामुळे सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव केला जात आहे. मुनवली येथील सचिन घाडी हे आपल्या भागातील ग्रामस्थांच्या सुदृढ आरोग्यासाठी नेहमीच विविध प्रकारचे उपक्रम राबवित असतात. गणेशोत्सव अगदी तोंडावर आला असल्याने त्यांनी ग्रामस्थांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी परिसरातील रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वाढलेले गवत, गल्लोगल्लीतील रस्त्यावर झालेले चिकट शेवाळ ब्लिचिंग पावडरच्या सहाय्याने काढणे, तसेच अंतर्गत रस्त्यावरील खड्डे भरणे, स्ट्रीट दिवे बसवणे व इतर सर्व प्रकारची स्वच्छता मोहीम यशस्वीपणे पूर्ण करून ग्रामस्थांना दिलासा दिला.

# महामंडळाचा नियोजनशून्य कारभार

**●ग्रामीण भागातील एसटी बसच्या फेऱ्या रद्द ● भरपावसात चाकरमान्यांना ताटकळत बसावे लागले**

| रोहा | प्रतिनिधी |

एसटी महामंडळ व रोहा आगार प्रमुखांच्या नियोजनशून्य कारभाराचा फटका चाकरमानी व सामान्य प्रवाशांना बसला आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने बोरिवली, ठाणे व कल्याण या प्रमुख शहरांतून कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांसाठी रोहा आगारातून सलग तीन दिवस ३० विशेष गाड्या सोडण्यात आल्या. त्यामुळे रोहा एसटी स्थानकातून ग्रामीण भागात जाणाऱ्या गाड्या रद्द केल्याने आपल्या गावी जाण्यासाठी मुंबई, ठाणे व इतर शहरांतून आलेल्या अन्य चाकरमान्यांना एसटी स्थानकात भरपावसाळ्यात ताटकळत बसावे लागले. गावी जाण्यासाठी एसटी बस उपलब्ध नसल्यामुळे प्रवासी व चाकरमान्यांचे खूप हाल झाले.



गणेशोत्सवाच्या निमित्ताने मुंबईत, ठाणे, गुजरात व अन्य प्रमुख शहरांतून हजारो गणेशभक्त सण साजरा करण्यासाठी रोह्यात रेल्वे व खासगी बसद्वारे येत असतात. रोह्यात आल्यानंतर पुढील प्रवासाकरिता एसटी स्थानकातून ग्रामीण भागात जाण्यासाठी विशेष गाड्या सोडल्या जातात. रोहा एसटी स्थानकातून तांबडी, घोसाळे, भालगाव, विरजोली त्याचप्रमाणे तळा, म्हसळा, मुरुड या तालुक्यांतील गणेशभक्त एसटीने प्रवास करत आपापल्या गावी जातात. मात्र, यावर्षी रेल्वेने आलेल्या प्रवाशांची त्यांच्या गावी जाण्याची वाट बिकट झाली आहे.

गेली तीन दिवस रोहा आगारातील गाड्या ह्या मुंबईमधून येणाऱ्या प्रवाशांसाठी पाठविल्या असल्यामुळे रोहा बस स्थानकवरून ग्रामीण फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. यामुळे रेल्वे, एसटी तसेच विविध मार्गाने आलेले मुंबईकर व रोह्यात खरेदीसाठी येणारे ग्रामीण भागातील नागरिकांना याचा मोठा फटका बसला आहे.

गेली कित्येक वर्षे पिठोरी पूजन झाल्यावर मुंबई व अन्य शहरातील नागरिक रोह्यात येऊन पुढे तळा, म्हसळा, मुरुड येथे जातात. ते त्यांना सोयीस्कर व आर्थिकदृष्ट्या परवडणारे असते. रोहा तालुक्यातील भालगाव, दापोली, कोकबन या ग्रामीण भागातील नागरिक गणपती खरेदीसाठी रोहा बाजारपेठेत येतात. दरम्यान, शनिवार ते सोमवार या बाहेर गावाहून येणारी प्रवासी संख्या व तालुक्यातील नागरिकांचे खरेदीच्या दिवसात रोहा आगारातून ग्रामीण भागातील एसटी फेऱ्या या बंद ठेवल्या आहेत. वाढती गर्दी लक्षात घेता ग्रामीण फेऱ्या वाढविण्याचे नियोजन आगारप्रमुखांनी करणे गरजेचे होते. मात्र, एसटी महामंडळाच्या गलथान कारभारामुळे गणेशभक्तांना एसटी स्थानकाच्या आवारात ताटकळत बसावे लागले.

> **“यावर्षी रोहा आगार कार्यालयातून बोरिवलीकरिता २२, ठाण्याकरिता सात व कल्याणकरिता एक अशा ३० गाड्या कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांनी बुक केल्याने रोहा ग्रामीण भागातील फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय झाली. मात्र, प्रवाशांच्या सोयीप्रमाणे तीन गाड्या रोहा आगारात उपलब्ध करण्यात आल्या होत्या.**
> **– अजिंक्य रोहेकर, आगार व्यवस्थापक, रोहा”**

**प्रवाशांना नाहक त्रास**

**रोहा आगार प्रमुखांच्या या नियोजनाशून्य कारभारामुळे गणेशभक्तांना रोह्यातून रिक्षा व अन्य खासगी वाहनांमधून प्रवास करावा लागल्याने प्रवाशांना नाहक मनस्ताप व आर्थिक भुर्दंड सोसावा लागला.**

## रेवदंड्यात खरेदीला उधाण

**परंपरा, आधुनिकता व पर्यावरणपूरकतेचा संगम**

| रेवदंडा | विशेष प्रतिनिधी |

गणेशोत्सव अवघ्या काही तासांवर येऊन ठेपला असून, रेवदंड्यासह अलिबाग, रोहा आणि पेण या आसपासच्या बाजारपेठांमध्ये खरेदीला उधाण आले आहे. श्रद्धा, परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम घडवत बाजारपेठा झगमगल्या आहेत.

फुलांची आरास, मूर्तींच्या सजावटीचे साहित्य, रोषणाईच्या माळा, विद्युत दिवे, कंदील, विविध प्रकारची मखरे आणि सजावटीच्या वस्तूंनी बाजारपेठा बहरल्या आहेत. विशेष म्हणजे, यंदा ग्राहकांची पसंती पर्यावरणपूरक सजावटीकडे जास्त असल्याचे स्पष्ट जाणवत आहे. कागद, बांबू व लगद्यापासून तयार



केलेली फोल्डेबल मखरे, तसेच घरगुती गणेशासाठी मिनी मखर ही नवीन संकल्पना लोकप्रिय ठरत आहे.

पावसाळ्याचा हंगाम लक्षात घेऊन वॉटरप्रूफ सजावटीचे साहित्य, तसेच एलईडी लाइट्सचा झगमगाट ग्राहकांना आकर्षित करत आहे. रेवदंडा, अलिबाग, पेण व रोहा बाजारपेठेत संकल्पनेवर आधारित मखरे, शिवकालीन किल्ले, अयोध्येतील राममंदिर व देवदेवतांचे कटआउट्स सजवलेले मखर ग्राहकांना भावत आहेत.

गणेशोत्सव हा केवळ भक्तीचा उत्सव नसून लघुउद्योजकांसाठी रोजगाराचाही मोठा हंगाम ठरतो. मूर्तिकार, डेकोरेटर्स, मखर निर्माते, इलेक्ट्रिक सामान विक्रेते, फुले आणि मिठाई व्यावसायिक यांच्यासाठी ही वेळ वर्षभराच्या धंद्याची संधी ठरते. स्थानिक विक्रेते सांगतात की, ‘‘दोन महिन्यांच्या विक्रीत वर्षभराचा धंदा उभा राहतो. ग्राहकांकडून यंदा उत्तम प्रतिसाद मिळतो आहे.’’ ‘‘मिठाईत ‘हेल्दी’ ट्रेंड‘‘मोदक, पेढे, लाडू यांसोबत यंदा शुगर-फ्री व मिलेटपासून बनवलेले मोदक विक्रीस आल्याने ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आरोग्याचा विचार करणाऱ्या भक्तांसाठी हा ट्रेंड लोकप्रिय ठरत आहे.

कंदील, एलईडी स्ट्रिप लाइट्स, फ्लॅशिंग सिरीज, प्रोजेक्शन लाइट्स यांच्या विक्रीत तब्बल २५ टक्क्यांची वाढ झाल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. संध्याकाळी रेवदंड्यासह अलिबाग, पेण व रोहा बाजारपेठांतील स्टॉल्स झगमगत असून, गणेशभक्त मंत्रमुग्ध होत आहेत. ‘गगनचुंबी मुंबई’सारख्या आधुनिक संकल्पनांवर आधारित मखरे, तसेच इतिहास व विज्ञान-तंत्रज्ञानाची सांगड घालून तयार केलेली सजावट ग्राहकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

## गणेशोत्सवासाठी तळा बाजारपेठ सजली

**पावसाच्या व्यत्ययाने व्यापाऱ्यांचा हिरमोड**

| तळा | प्रतिनिधी |

गणरायाचे आगमन यंदा लवकरच असल्याने गणेशोत्सवात लागणाऱ्या विविध साहित्यांनी तळा बाजारपेठ सजली आहे. गणेशोत्सवासाठी अवघे काही तास शिल्लक असल्याने चाकरमानी आपल्या गावी येत आहेत.

तळा हे तालुक्याचे ठिकाण असल्याने खेड्यातील नागरिक खरेदीसाठी शहरात येत असतात. तसेच फळे, पालेभाज्या व इतर जीवनावश्यक वस्तू माफक दरात मिळत असल्याने खरेदीसाठी नागरिकांनी गर्दी केली आहे. मात्र, सोमवारपासून पुन्हा पावसाने हजेरी लावल्याने याचा मोठा परिणाम बाजारपेठेवर झाला असून, पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली आहे. गणरायाच्या पूजेसाठी लागणारे धूप, कापूर, अगरबत्ती, गळ्यातील कंठीहार, सजावटीसाठी लागणारे कृत्रिम फुलांच्या माळा तसेच विविध साहित्यांनी तळा बाजारपेठ सजली आहे. मात्र, पावसाच्या व्यत्ययामुळे बाजारपेठेवर परिणाम होत असल्याने व्यापारांचा हिरमोड झाला आहे.

## पनवेल-नवीन पनवेल भुयारी मार्ग पाण्याखाली

- **पुलाखाली धबधब्यासारखा पाण्याचा मारा**
- **वाहनचालक त्रस्त, प्रशासनाकडे उपाययोजनेची मागणी**

| पनवेल | प्रतिनिधी |

नवीन पनवेल आणि पनवेलला जोडणाऱ्या भुयारी मार्गात मुसळधार पावसामुळे पाणी साचले असून, वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पनवेल-कर्जत रेल्वे मार्ग व कॉरिडोरसाठी उभारण्यात आलेल्या नवीन पुलाच्या भिंतींमधून पाणी जोरात झिरपून धबधब्यासारखे वाहात आहे. सततचा पाऊस व पाण्याचा प्रचंड वेग यामुळे वाहनांची हालचाल मंदावली असून, वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली आहे. नागरिक व वाहनचालक त्रस्त असून, तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. स्थानिक प्रशासन व रेल्वे विभागाकडे लक्ष देण्याची गरज अधोरेखित केली जात आहे.

## अध्यक्षपदी अंकुश जैन यांची निवड

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठण्यातील गणेशोत्सव मंडळ बाजारपेठच्या अध्यक्षपदी बाजारपेठमधील व्यावसायिक अंकुश श्रीपाल जैन यांची निवड करण्यात आली आहे. मंडळाचे हे ४५ वे वर्ष आहे.



या मंडळाच्या यावर्षीच्या उर्वरित कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी सचिन मोदी, सचिव चंदन मोरे, सहसचिव रमेश जाधव, खजिनदार विक्रम जैन, सहखजिनदार चेतन ठक्कर, कार्याध्यक्ष अतुल काळे आदींची एकमताने निवड करण्यात आली आहे.

## शेकडो कुटुंबांना पूजा साहित्य वाटप

| सोगाव | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील मापगाव विभागातील सात गावांमध्ये गणेशोत्सवानिमित्ताने सुमारे ५३० कुटुंबांना गणेश पूजन साहित्य वाटप उपक्रमाचे मापगाव येथील गणेश मंदिरात रविवार, दि. २५ ऑगस्ट रोजी मान्यवरांच्या हस्ते मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले.

ग्रामविकास परिवर्तन आघाडी मापगाव यांचे सर्व कार्यकर्ते हे मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील सर्व समाजातील ग्रामस्थांना प्रत्येक सणांमध्ये नेहमीच मदत करत असतात, तसेच ग्रामस्थांसाठी दरवर्षी सामाजिक,




शैक्षणिक, आरोग्य व इतर उपक्रम राबवित असतात. यावर्षीदेखील मापगाव, बहिरोळे, बेलवली, मुशेत, चोरोंडे, सोगाव, मुनवली या सात गावांतील सुमारे ५३० गणेशभक्तांना पूजेचे साहित्य वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ग्रामविकास परिवर्तन आघाडीचे सर्वच कार्यकर्ते आवर्जून मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## मोरबे धरणाचे दरवाजे पुन्हा उघडले

- **नदीकाठच्या गावांना दिला सतर्कतेचा इशारा**

| वावोशी | प्रतिनिधी |

नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणाची महत्तम पाणीपातळी ८८.०० मीटर इतकी आहे. माथेरान डोंगर भागात सातत्याने पाऊस होत असल्यामुळे धरणातील पाण्याची पातळी वाढली आहे. त्यामुळे सोमवार, दि. २५ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता मोरबे धरणाचे दोन्ही वक्राकार दरवाजे २५ सेंटीमीटरने उघडण्यात आले असून, याद्वारे धरणातून सुमारे ११२३ क्युसेक पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सुरू झाला आहे. यामुळे धावरी व पाताळगंगा नदीकाठी असलेल्या गावांमध्ये पाण्याची पातळी वाढण्याची शक्यता असल्याने संबंधित प्रशासनाकडून सर्व ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

नवी मुंबई महानगरपालिका, खालापूर तहसीलदार कार्यालय व पोलीस प्रशासनाकडून नागरिकांना नदीपात्रात न उतरण्याचे तसेच आवश्यक तेथे सुरक्षिततेची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

## आदिवासी भागातील वनप्रश्न सोडवा

**खा. बारणेंना मागणीचे निवेदन**

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील मोठ्या प्रमाणात आदिवासी वस्ती करून राहात आहे. त्यात मूलवासी असलेल्या आदिवासी समाजाच्या वस्तीला लागून वन जमीन आहे. या वन जमिनीसंदर्भातील प्रश्न नवी दिल्ली येथील संबंधित असून, हे सर्व प्रश्न सोडवावे, अशी मागणी करणारे निवेदन खा. श्रीरंग बारणे यांना कर्जत तालुका आदिवासी संघटनेच्यावतीने देण्यात आले.

कर्जत तालुक्यातील वन जमिनीच्या प्रश्नावर कर्जत तालुका



आदिवासी समाज संघटनेने मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांची पुणे येथील कार्यालयात भेट घेतली. त्यावेळी आदिवासी समाज संघटनेचे अध्यक्ष परशुराम दरवडा, तसेच सहसचिव नितीन निरगुडा, सल्लागार मनोहर दरवडा, जयवंत उघडा, भरत आगिवले, हरिश्चंद्र फसाळी आदी उपस्थित होते. कर्जत तालुका आदिवासी संघटनेने दिलेल्या निवेदनात वन जमिनी आणि दळी जमिनीबाबत निर्णय व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. आदिवासी समाजाच्या जमिनीबाबत निर्णय घेऊन त्या जमिनी ७/१२ नावे करावेत, नऊ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिन असल्याने शासकीय सुट्टी जाहीर करावी, आदिवासीबहुल कर्जत तालुक्यामध्ये पेसा कायदा लागू करण्यात यावा, नेरळ, कर्जत आणि कळंब येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह निर्माण करावीत, अशा अनेक मागण्यांचे निवेदन खा. बारणेंना देण्यात आले.

**कृषी महाविद्यालय, नगरपरिषदेचा उपक्रम | संक्रांतीला मिळणार खताची भेट**

# निर्माल्य द्या, कंपोस्ट खत घ्या!

| महाड | प्रतिनिधी |

गणपती बाप्पाची मनोभावे सेवा करताना पाने, फुले, फळे, पत्री त्याच्या चरणी वाहिली जातात. श्रद्धेने वाहिले जाणारे हे निर्माल्य कचरा कुंडीत फेकून न देता एकत्र करून ते दिल्यास संक्रांतीच्या दिवशी अंगणातील रोपांसाठी सेंद्रीय खत घेऊन जा, असे आवाहन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली संलग्नित कृषी महाविद्यालय महाड आणि महाड नगरपरिषदेकडून केले आहे.

कोकणात अवघ्या एका दिवसात लाडक्या गणरायाचे घरोघरी आगमन होणार आहे. बाप्पाची पूजा करताना त्याला पाने, फुले, हार, फळे, पत्री, दुर्वा असे सारे काही मनोभावे रोज अर्पण केले जाते. या पाना-फुलांचे दुसऱ्या दिवशी निर्माल्य होते. हे



निर्माल्य कचऱ्याच्या डब्यात तेथून घंटागाडीत आणि नंतर थेट कचरा डेपोमध्ये जाते. परमेश्वरचरणी वाहिले जाणारे हे निर्माल्य पुन्हा निसर्गामध्येच एकरूप व्हावे ह्या संकल्पनेतून उत्सव काळात घरात निघणारे निर्माल्य गणेशभक्तांनी फेकून न देता संकलित करावे, असे आवाहन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वैभव गिम्हवणेकर यांनी केले आहे. त्याचे उत्कृष्ट सेंद्रीय (कंपोस्ट) खत तयार केले जाते. १४ जानेवारी २०२६ रोजी संक्रांतीला तिळगुळ देण्यासाठी येणाऱ्यांना हे कंपोस्ट खत भेट म्हणून दिले जाणार आहे. घराच्या बाल्कनी, टेरेसवरील कुंड्या किंवा अंगणातील झाडांना हे सेंद्रीय खत टाकून निसर्ग देवतेला स्मरण्याचे आवाहन कृषी महाविद्यालय, महाडकडून केले जात आहे.

निर्माल्य संकलित करण्यासाठी ग्राम मोहोप्रे-महाड येथील कृषी महाविद्यालयाचे कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्पांतर्गत विशेष संकलन केंद्र उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कचरा निर्मूलन, कचरा विलगीकरणाची सवय लागणे आणि आपल्याच घरातील कुंडीत फळभाजी व पालेभाजी पिकविण्याचा आनंद नागरिकांना मिळावा, असा या उपक्रमामागील उद्देश आहे. निर्माल्याचे उत्कृष्ट कंपोस्ट खत तयार होण्यास तीन ते चार महिने लागतात. तयार झालेले कंपोस्ट खत गणेशभक्तांना मोफत वाटप करण्यात येणार आहे. निर्माल्य संकलनासाठी गणेशभक्तांनी प्राचार्य डॉ. वैभव गिम्हवणेकर ८३९०७१७३६५ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी महाविद्यालय आणि महाड नगर परिषदेच्यावतीने करण्यात आले आहे.

## आसरेच्या उपसरपंचपदी सुनीता पाटील बिनविरोध

| रसायनी | प्रतिनिधी |

खालापूर तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत आसरेच्या उपसरपंचपदी सुनीता रोहिदास पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आसरेचे उपसरपंच जगदीश निकम यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंचपदाची निवड सरपंच तथा निवडणूक निर्णय अधिकारी बळीराम जांभळे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालयात पार पडली. सुनीता पाटील यांचा उपसरपंचपदाचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे बळीराम जांभळे यांनी जाहीर केले. निवडणुकीत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ग्रामपंचायत अधिकारी गोकुळदास राठोड यांनी कामकाज पाहिले.



# नाराज शिंदे, सक्रीय जरांगे

मनोज जरांगे यांनी येत्या २९ ऑगस्टला मुंबईतून आंदोलन सुरू करण्याचा इशारा दिला आहे. काल रविवारी त्यासाठी संभाजीनगरमध्ये मोठी इशारा सभा झाली. जरांगे या आंदोलनाबाबत गेले किमान दोन महिने बोलत आहेत. ऐन गणपतीमध्ये मुंबईत त्यांनी येऊ नये असे सरकारातील व इतरही नेत्यांनी सुचवून झालेले आहे. पण ते जरांगे यांनी मान्य केलेले नाही. जरांगे यांनी तीन वर्षांपूर्वी जालन्याच्या आंतरवाली सराटीसारख्या अत्यंत छोट्या गावात राहूनही सगळ्या सरकारला आणि अख्ख्या महाराष्ट्राला धारेवर धरलेले सर्वांनी पाहिले आहे. त्यावेळी वृत्तवाहिन्या, माध्यमे व राजकारणी दिवसरात्र केवळ जरांगे यांच्याविषयीच बोलत होते. त्यांच्या आंदोलनावर लाठीमार झाल्याने मामला सर्वात जास्त भडकला. त्यानंतर जरांगे यांनी दोन-तीनदा उपोषणे केली. एकदा ते नवी मुंबईपर्यंत येऊन गेले. त्यावेळी सोयरेधायरे अशा सर्वांना मराठा आरक्षणाचा फायदा दिला जाईल असे आश्वासन तेव्हाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. शिंदे यांच्याच हस्ते रस पिऊन जरांगे यांनी उपोषण थांबवले. किंबहुना, शिंदे आणि जरांगे यांचे संबंध इतर कोणाहीपेक्षा मधुर आहेत हे लपून राहिलेले नाही. त्यामुळे आतादेखील या आंदोलनाला हा राजकीय पैलू आहे की काय याचा तपास करायला हवा. मध्यंतरी विधानसभा निवडणुका लागल्याने जरांगेंचे आंदोलन पिछाडीवर गेले. त्यातही भाजपला अभूतपूर्व यश मिळाल्याने जरांगे स्तंभित झाले असावेत. कारण त्यांनी तोवर सातत्याने देवेंद्र फडणवीसांवर टोकाची टीका केली होती. आंदोलनांच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची स्तुती आणि देवेंद्र यांच्यावर आंदोलन फोडण्याचे आरोप असे दुहेरी सत्र त्यांनी चालू ठेवले. पण निवडणुकीनंतर तेच देवेंद्र इतके सामर्थ्यवान होऊन बसले की त्यांना शिंदे शिवसेनेच्या पाठिंब्याची तितकीशी गरज राहिली नाही. त्यामुळेच मधल्या काळात जरांगे हे गप्प असावेत. पण आता शिंदे यांनी आपली नाराजी उघडपणे दाखवायला सुरुवात केल्यावर तिकडे जरांगे यांनाही कंठ फुटला आहे. हा निव्वळ योगायोग आहे की, यामागे काही राजकीय अर्थ दडलेला आहे हे काही काळाने समजेलच.

## शिंदे यांचा दांडीमारुपणा

जरांगे यांनी आंदोलनाची घोषणा आधीच केली होती हे खरे आहे. पण आता राज्य मंत्रिमंडळात शिंदे अस्वस्थ असतानाच जरांगे यांच्या आंदोलनाला धार येणार आहे. गेल्या दोन मंत्रिमंडळाच्या बैठकांना शिंदे हजर राहिलेले नाहीत. एकदा तर ते काश्मीरहून परत येत असतानाच पुन्हा तिकडे गेले. फडणवीसांसोबतचे किमान चार पाच महत्वाचे कार्यक्रम त्यांनी टाळलेले आहेत. राज्य चित्रपट पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते गैरहजर होते. नंतर पायाभूत सोईंबाबतच्या एका महत्वाच्या बैठकीला ते हजर नव्हते. परवा मुंबईत पूर आला तेव्हा आपत्ती निवारणाबाबत मुख्यमंत्र्यांनी घेतलेल्या तातडीच्या बैठकीलाही मुंबई व ठाण्याचे मानलेले पालकमंत्री असलेल्या शिंदे यांनी दांडी मारली. गंमत म्हणजे ही बैठक संपल्यानंतर ते मंत्रालयातील आपत्कालीन कक्षात दाखल झाले. शिंदे यांच्या या दांडीमारू वर्तनाबद्दल फडणवीस किंवा शिंदे यांनी कोणताही खुलासा केलेला नाही. मध्यंतरी ते अचानक सहकुटुंब जाऊन पंतप्रधान मोदींना भेटले. त्यांच्या गटातील भरत गोगावले व दादा भुसे यांना ते पालकमंत्रिपदे मिळवून देऊ शकलेले नाहीत. शिवाय ठाण्यामध्ये गणेश नाईक व भाजपवाले त्यांच्या गटाला वारंवार सुरुंग लावण्याचा प्रयत्न करीत आहेत. नाईकांनी आतापर्यंत ठाण्यात दोन जनता दरबार भरवले. शिंदे यांच्या खात्याचे प्रस्ताव आपल्याकडे प्रथम मान्यतेसाठी आले पाहिजेच असा दंडक देवेंद्रांनी घालून दिला आहे. आता तर देवेंद्र शिंदे यांच्या नगरविकास खात्याच्या कारभारावर नाराज असल्याच्या बातम्या आहेत. त्या जर खऱ्या असतील तर मंत्रिमंडळाच्या आतून प्रचंड मोठा असंतोष खदखदतो आहे. येत्या पंचायत निवडणुकांमध्ये किंवा नंतर त्याचा मोठा स्फोट होऊ शकतो. मुंबईमध्ये राज व उद्धव यांना एकत्र होऊन देऊन त्यांच्यामार्फत शिंदे सेनेची मते कमी करण्याचा डाव देवेंद्रांनी टाकला आहे. भाजप स्वतःच्या बळावर हिंदी, गुजराती व काही प्रमाणात मराठी मतदारांची मते मिळवून मुंबई पालिका जिंकू शकतो असे देवेंद्रांचे आडाखे आहेत. असे झाले तर शिंदे यांचे उरलेसुरले महत्वही खलास होईल.

## फडणवीसविरोधात आघाडी

नेमक्या याच वेळी पुन्हा जरांगे मुंबईत दाखल होत आहेत. भाजप हा मराठा आरक्षणातला मोठा शत्रू असून देवेंद्र हे ब्राह्मण नेते भाजपचे डावपेच आखत आहेत असा जरांगे यांच्या आरोपांमागचा अभिप्रेत अर्थ असतो. दुसरीकडे भाजपच्या रक्तात ओबीसींचा डीएनए आहे असे सांगून देवेंद्रांनी गेल्याच आंदोलनाच्या वेळी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मुंबईत मराठी आणि महाराष्ट्रात मराठा मते नाही मिळाली तरीही निवडणुका कशा जिंकता येतील याचे एक समीकरण भाजपने मांडले आहे. आजवर तरी ते यशस्वी झाले आहे. शिवाय भाजपने मराठ्यांना आपल्या बाजूने वळवण्याचे सोडलेले नाही. आता मराठा आरक्षणाबाबत जी उपसमिती नेमण्यात आली आहे तिचे अध्यक्षपद नगर जिल्ह्यातले साखरसम्राट राधाकृष्ण विखे यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. जरांगे यांच्या आंदोलनाचा परिणाम मराठवाडा, नाशिक, नगर, सोलापूर अशा जिल्ह्यांमध्ये अधिक आहे. त्या दृष्टीने विखे यांचा उपयोग होईल. याउलट एकनाथ शिंदे यांना मराठे किंवा जरांगे यांना देण्यासारखे काहीच राहिलेले नाही. पूर्वी मुख्यमंत्री म्हणून सत्ता होती. आता सर्व बाजूंनी पंख कापले गेले आहेत. दुसरे म्हणजे शिंदे यांनी गेल्या वेळी जरांगे यांचे उपोषण सोडवले तेव्हा ते औट घटकेचे हिरो होते. पण पंधराच दिवसांनी आपली फसवणूक झाली असे जरांगे म्हणू लागले होते. सगेसोयरे यांच्या अध्यादेशामध्ये आपला मोठा विजय झाला असे जरांगे यांनी आधी भासवले होते. पण शिंदे यांच्या सरकारने त्यांच्या तोंडाला पाने पुसली हे लगेचच त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे जरांगे आता उघडपणे शिंदे यांची स्तुतीही करू शकणार नाहीत. आता जरांगे मुंबईत येतील, त्यांना मिडियामधून भरपूर प्रसिद्धी मिळेल. सर्व पक्षांचे नेते त्यांना भेटायला जातील. यावेळी आरक्षण घेतल्याशिवाय माघारी जाणार नाही असा पण त्यांनी केला आहे. तसे न करता गेल्या वेळेप्रमाणे आंदोलन गुंडाळले तर जरांगे यांचे महत्व संपुष्टात येईल. ओबीसी कोट्यातून मराठ्यांना आरक्षण मिळावे ही जरांगे यांची मुख्य मागणी आहे. ती पूर्ण होणे अशक्य आहे. तसे झालेच तर ओबीसी गटांमध्ये भडका उडेल. आगामी पंचायत निवडणुकीच्या तोंडावर हा भडका सरकारला परवडणार नाही. त्यामुळे जरांगे यांना तात्पुरती समजूत घालून बहुदा परत पाठवले जाईल. या सर्व प्रक्रियेत जरांगे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावरच भरवसा व्यक्त करायचा व मराठ्यांचे एकमेव आशास्थान शिंदे आहेत असे भासवायचे असा एक डाव असू शकतो. भाजप याला कसे उत्तर देतो ते पाहावे लागेल.

विचार

# आधी धमकी, नंतर घातले शेपूट

***पाकिस्तानचे लष्करप्रमुख, तिथले परराष्ट्रमंत्री भारतावर वारंवार अणुबाँब हल्ला करण्याची धमकी देतात. त्यावर प्रतिक्रिया आल्या की शेपूट घालतात. आताही लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना भारतावर अणुबाँब हल्ल्याची धमकी दिली. त्यानंतर अमेरिकेतून उमटलेल्या प्रतिक्रिया आणि भारताने दिलेल्या सडेतोड उत्तराम ुळे पाकिस्तानने लष्करप्रमुखांनी धमकी दिलीच नव्हती, असा 'यू टर्न' घेतला.***




आरिफ शेख

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना सध्या पाकिस्तानचा फार पुळका आला आहे. गेल्या पाच महिन्यांमध्ये पाकिस्तानचे लष्करप्रमुख दोनदा अमेरिकेला गेले. आताच्या दौऱ्यात फ्लोरिडाच्या टाम्पा येथे पाकिस्तानी स्थलांतरितांना संबोधित करताना मुनीर यांनी भविष्यात भारताशी युद्ध झाले आणि पाकिस्तानचे अस्तित्व धोक्यात आले तर अणु हल्ला करण्याची धमकी दिली. पाकिस्तानी लष्करप्रमुखांनी सिंधू पाणी करारावरही विधान केले. पाकिस्तानचा पाणीपुरवठा थांबवल्यास भारताने सिंधू नदीवर बांधलेले धरण पाकिस्तान क्षेपणास्त्राने उडवून देईल, अशी धमकी दिली. त्याचबरोबर गुजरातमधील मुकेश अंबानी यांचा प्रकल्प उडवून देण्याची धमकीही दिली. त्यांचे हे वक्तव्य माध्यमांतून प्रसिद्ध झाले. ज्या फांदीवर आपण बसलो आहोत, त्यावरच कुऱ्हाड चालवत आहोत, हे त्यांच्या फार उशिरा लक्षात आले. सिंधू नदीवरचे धरण उडवल्यास त्याचे पाणी पाकिस्तानमध्ये जाऊन त्यात त्या देशाचाच बराच भाग वाहून जाईल, हे त्यांच्या लक्षात आले नाही. त्यांच्या वक्तव्यावर अमेरिकेच्या काही माजी मुत्सद्दी अधिकाऱ्यांच्या प्रतिक्रिया आल्या. पाकिस्तानला दहशतवादी देश जाहीर करण्याची थेट मागणी व्हायला लागली. मुनीर यांनी दिलेली ही पहिलीच धमकी आहे, अशातला भाग नाही. पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री बिलावल भुट्टो यांनीही अलिकडच्या काळात अशा धमक्या वारंवार दिल्या. मुनीर यांनी दिलेली अणुयुद्धाची धमकी गांभीर्याने घेतली पाहिजे. पाकिस्तानची अणुऊर्जा संपूर्ण जगासाठी धोका आहे. त्यावर पाळत ठेवण्याची गरज आहे. विशेष म्हणजे मुनीर यांच्या भाषणात पाकिस्तानचा नाश झाला, तरी चालेल; परंतु भारत नष्ट झाला पाहिजे, असा उल्लेख होता. याचा अर्थ नवरा मेला तरी चालेल; परंतु सवत विधवा झाली पाहिजे, असा आहे.

अविचाराने विधाने केल्यास दुसरे काहीच निष्पन्न होत नसते. अमेरिकेच्या भूमीवरून तिसऱ्या देशासाठी कोणी तरी असे धमकीचे शब्द वापरण्याची ही पहिलीच वेळ आहे. मुनीर यांचे शब्द जितके बेजबाबदार आहेत, तितकेच चिंताजनक आहेत. पाकिस्तानच्या व्यवस्थेत सैन्याची भूमिका काय आहे हे सर्वांना माहिती आहे. तिथे निवडून आलेले सरकार असले, तरी निर्णय लष्करप्रमुख घेतात. अशा परिस्थितीत मुनीर यांचे विधान पाकिस्तानचे धोरण म्हणून पाहिले पाहिजे. भारताकडे अणुबाँब, अण्वस्त्रे असली, तरी भारताने 'प्रथम वापर नाही' असे धोरण स्वीकारले आहे. म्हणजेच भारत प्रथम अण्वस्त्रे वापरणार नाही. तसेच अण्वस्त्र नसलेल्या कोणत्याही देशाविरुद्ध अण्वस्त्राचा वापर करणार नाही; परंतु पाकिस्तान अशा कोणत्याही भूमिकेला बांधील नाही आणि ही चिंतेची बाब आहे. 'आपण आपल्यासह अर्धे जग बुडवू' ही मुनीर यांची भाषा पाकिस्तानच्या असुरक्षित अणु सिद्धांताचे उदाहरण आहे. मुनीर यांचे विधान चिथावणीखोर आणि शांततेच्या प्रयत्नांच्या विरोधात आहे. या गोष्टींसाठी त्यांनी ते ठिकाण निवडले, ज्याचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प अर्धा डझन युद्धे थांबवल्याचा दावा करत शांततेचा नोबेल पुरस्कार मिळण्यासाठी प्रयत्नशील आहेत. मुनीर दोन महिन्यांमध्ये दुसऱ्यांदा अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले, ही सामान्य बाब असू शकत नाही. या दोन महिन्यांमध्ये दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये बरेच बदल झाले आहेत.

ट्रम्प आता पाकिस्तानला एक प्रमुख प्रादेशिक मित्र मानतात. लष्कर आणि दहशतवादी गटांची मिलीभगत असलेल्या देशांमध्ये अणु कमांड आणि कंट्रोलच्या विश्वासार्हतेवर शंका घेतली जाणे स्वाभाविक आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने याबाबत प्रतिक्रिया देताना अशा कोणत्याही अण्वस्त्रांच्या ब्लॅकमेलिंगपुढे भारत झुकणार नाही, असे म्हटले. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यानही सरकारची भूमिका अशीच होती. भारताने मुनीर यांच्या विधानाचा वापर पाकिस्तानवर आंतरराष्ट्रीय दबाव वाढवण्यासाठी आणि त्यांचा अणुकार्यक्रम मर्यादित करण्यासाठी करायला हवा. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये पराभव झाल्यानंतर, मुनीर अमेरिकेच्या भूमीवरून भारताला धमकावत असतील, तर त्याला हास्यास्पद नाही तर काय म्हणावे? हे खरे आहे, की प्रदीर्घ काळानंतर अमेरिकेने पाकिस्तानशी मैत्रीचा हात पुढे केला आहे; परंतु याचा अर्थ असा नाही, की मुनीर यांनी काहीही अकलेचे तारे तोडावेत आणि भारताने त्याकडे निमूटपणे पहावे. अयशस्वी इस्लामिक प्रजासत्ताकाचा सर्वोच्च लष्करी अधिकारी म्हणून आपले स्थान सुरक्षित करण्यासाठी मुनीर भारताविरुद्ध द्वेषपूर्ण विधानांचा आधार घेत आहे. गंमतीची बाब म्हणजे असे करताना ते पाकिस्तानची भारताशी तुलना करताना भारताला मर्सिडीज बेंझ आणि पाकिस्तानला कचऱ्याचा ट्रक म्हणतात. याचा अर्थ ते अप्रत्यक्षपणे भारताचे कौतुक करत आहे. अर्थात पोकळ धमक्या देणे हा पाकिस्तानचा स्वभाव आहे.

अमेरिकेने १९४५ मध्ये नागासाकीवर टाकलेल्या अणुबॉम्बचा ८० वा स्मरण दिन जग पाळत असतानाच एका बेजबाबदार राष्ट्राच्या लष्करप्रमुखांनी दिलेल्या धमकीचे पडसाद जगभर उमटले नसते, तरच नवल. अशा परिस्थितीत पाकिस्तानला फटकारताना, मानवतेचा नाश करू शकणारी अण्वस्त्रे तेथील दहशतवाद्यांपर्यंत पोहोचण्याची पूर्ण शक्यता असल्याची भारताची चिंता निराधार नाही. पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देताना भारताने अमेरिकेला एक मित्र देश म्हटले असले, तरी गेल्या काही महिन्यांमध्ये अमेरिकेने दाखवलेल्या दुटप्पीपणामुळे दहशतवादाविरुद्धच्या त्यांच्या भूमिकेची विश्वासार्हता कमी झाली नाही, तर पाकिस्तानमध्ये दहशतवादाचा नव्याने उदय होण्याची शक्यताही निर्माण झाली आहे. मुनीर यांच्या परवाच्या विधानांमधून पाकिस्तानची अण्वस्त्रे एका बेजबाबदार देशाच्या हातात आहेत, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. हिरोशिमा आणि नागासाकीवर अमेरिकेने टाकलेल्या अणुहल्ल्यात सुमारे एक लाख सत्तर हजार लोक मारले गेले, तरीही अमेरिकेने या विधानावर मौन बाळगले; परंतु अमेरिकेच्या माजी अधिकाऱ्यांच्या याबाबत उमटलेल्या प्रतिक्रिया मात्र लक्षात घ्याव्या लागतील. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात अमेरिका आणि पाकिस्तानमधील संबंध बरेच मजबूत झाले आहेत. ट्रम्प यांनी पाकिस्तानच्या नागरी सरकारऐवजी पाकिस्तानी सैन्याला, विशेषतः मुनीर यांना अधिक म हत्त्व दिले आहे. जूनमध्ये ट्रम्प यांनी मुनीर यांना 'व्हाईट हाऊस'मध्ये जेवणासाठी आमंत्रित केले होते. वस्तूतः तिथे राष्ट्रप्रमुखांनाच आमंत्रित केले जाते.

कच्च्या तेलाच्या उत्खननाबाबत अमेरिका आणि पाकिस्तानमध्ये एक करारही झाला. अशा परिस्थितीत मुनीर यांनी आपल्या प्रक्षोभक विधानांसाठी अमेरिका हे व्यासपीठ म्हणून निवडणे ही एक विचारपूर्वक केलेली रणनीती असू शकते. मुनीर यांना केवळ पाकिस्तानम ध्येच नव्हे, तर संपूर्ण जगात बातम्यांमध्ये येण्याची संधी मिळाली. मुनीर यांच्या धमक्या आश्चर्यकारक नाहीत, असे राजनयिक तज्ज्ञांचे मत आहे. जनरल अयुब यांच्यापासून झिया आणि मुशर्रफपर्यंत पाकिस्तानच्या इतर हुकूमशहांनाही अमेरिका खरा मित्र वाटत होता; परंतु अमेरिकेने नेहमीच पाकिस्तानला त्याची जागा दाखवून दिली. अमेरिकेसाठी पाकिस्तान हा वापर करुन फेकून देण्यापेक्षा अधिक काही नाही. याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे अफगाणिस्तान युद्ध, या युद्धामध्ये पाकिस्तानने सहभागी होण्याची मोठी किंमत मोजली आहे. तथापि, अमेरिकेने दिलेल्या मदतीत समाधान मानणे हे गरीब पाकिस्तानसाठी मोठ्या ट्रॉफीपेक्षा कमी वाटत नाही. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ज्या प्रकारे शेजारी देशाला मोठा धक्का दिला, 'ऑपरेशन सिंदूर' करून पाकिस्तानला गुडघे टेकायला भाग पाडले, त्याने जगाला आश्चर्याचा धक्का बसला. पाकिस्तान मात्र अद्याप या पराभवातून सावरलेला नाही. भारताची धाडसी वृत्ती आणि राजनैतिक हालचालींमुळे अमेरिकाही मागे पडली. त्यामुळेच पाकिस्तानला खूश करून भारताला आपला अनुनय करायला लावण्याचा विचार ते करत आहेत. तथापि, अमेरिकेचे हे पाऊल यशस्वी होताना दिसत नाही. रशियाशी मैत्री नाकारायला तयार नसल्याने पाकिस्तानला चुचकारून भारतावर दबाव आणण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. त्यामुळेच एका भुक्कड नेत्याने अमेरिकेच्या भूमीवरून अणुहल्ल्याची धमकी देऊनही ट्रम्प आणि कंपूने मौन बाळगले आहे.

चर्चा आजची

# बाप्पाच्या आगमनाची लगबग



प्रमोद जाधव

गणरायाचे आगमन बुधवारी होणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात ठिकठिकाणी जल्लोष सुरु झाला आहे. भक्तांच्या उत्साहाला उधाण आले आहे. जिल्ह्यात सर्वत्र नवचैतन्य निर्माण झाले आहे. जिल्ह्यामध्ये एक लाख दोन हजार ४८४ गणेशमुर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. यामध्ये २८६ सार्वजनिक व एक लाख दोन हजार १९८ घरगुती गणेशमुर्तींचा समावेश आहे. त्यामुळे बाप्पाच्या आगमनाची लगबग वाढली असल्याचे चित्र दिसून येत आहे.

गणरायाचे आगमन बुधवारी (दि.२७) ऑगस्ट रोजी होणार आहे. गतवर्षीच्या तुलनेने यंदा दहा दिवस अगोदरच गणरायाचे आगमन होणार आहे. गणपत्ती बाप्पा मोरया... असा जयघोष करीत जिल्ह्यामध्ये बाप्पाच्या स्वागताची तयारी जोरात सुरु आहे. वेगवेगळ्या प्रकारचे डेकोरेशन करण्यावर भर देण्यात आला आहे. जिल्ह्यात गणेशमुर्ती बुकींग झाल्या असून मुर्ती घरी आणण्याची तयारी सुरु झाली आहे. काहीजण आदल्या दिवशी मंगळवारी तर काहीजण बुधवारी गणेशमुर्ती घरी आणणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने यावर्षी नशा मुक्तीसह बेटी बचाव बेटी पढाव, स्वच्छतेविषयी चलचित्राचे सादरीकरण करणार आहे. दीड दिवसांपासून पाच, सात व दहा दिवस वेगवेगळे उपक्रम राबविले जाणार आहे. पारंपारिक भजनांसह जाखडी नृत्यांचे सादरीकरण केले जाणार आहे. वेगवेगळे सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम राबविले जाणार आहेत.

जिल्ह्यामध्ये एक लाख दोन हजार ४८४ गणेशमुर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. दीड दिवसाचे २५ हजार ५५१, पाच दिवसांचे एक हजार ३२२, सात दिवसांचे ५६ हजार ४६८ तसेच अकरा दिवसांचे म्हणजे अनंत चतुर्थीचे १८ हजार २११ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यात दोन हजार ८९४ पोलिसांचा ताफा असणार आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, गणेशोत्सव आनंदमय वातावरणात साजरा करता यावा म्हणून रायगड पोलिसांनी सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. पोलीस उप अधीक्षक ०७, पोलीस निरीक्षक २७, सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक १२८, अंमलदार एक हजार ९००, होमगार्ड ५००, बाहेरील ३० पोलीस अधिकारी, ३०० पोलीस अंमलदार व एक एसआरपीएफ कंपनीचा समावेश असणार आहे.

रायगड जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गणरायाच्या आगमनापासून विसर्जनापर्यंत वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. परंतु उत्सव साजरा होत असताना काही मंडळी वाद निर्माण करून कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर रायगड पोलिसांनी कारवाईचे सत्र हाती घेतले आहे. जिल्ह्यातील एक हजार १५० जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार आहे. भारतीय नागरी सुरक्षा अधिनियम अंतर्गत ही कारवाई केली जाणार असल्याची माहिती रायगड पोलिसांकडून देण्यात आली आहे.

नोकरी व्यवसायानिमित्त मुंबई व ठाण्यात राहणाऱ्या चाकरमान्यांची रायगडसह कोकणात जाण्याची लगबग सुरु झाली आहे. मुंबई, ठाण्यातून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांची गैरसोय होऊ नये यासाठी रायगडमधून ज्यादा बसेसची मागणी करण्यात आली आहे. जिल्ह्यातून १७२ बसेस शनिवारी (दि. २३) पाठविण्यात आल्या आहेत. सोमवारी (दि.२५), २७ आणि मंगळवारी (दि.२६) २७ अशा एकूण ५४ बसेस महाड आगारातून पाठविण्यात आल्या आहेत.या बसेस ठाणे व मुंबईतील चाकरमान्यांना घेऊन कोकणात निघाले आहेत. सहा ठिकाणी दुरुस्ती पथकमुंबईतून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व्हावा, एसटीचा बिघाड झाल्यास तातडीने त्याची दुरुस्ती व्हावी, यासाठी एसटी महामंडळ रायगड विभागामार्फत जिल्ह्यात सहा ठिकाणी दुरुस्ती पथक नियुक्त केले आहे.

खारपाडा, पेण, नागोठणे, कोलाड, महाड, कशेडी या भागात हे पथक नेमण्यात आले आहेत. या पथकामध्ये मॅकेनिक, पर्यवेक्षकांचा समावेश असणार असल्याचे सांगण्यात आले. गणेशोत्सवासाठी सजावटीचे साहित्य, पुजेचे साहित्य विविध प्रकारची फळे मिठाई, पर्यावरण पुरक आरास विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात खरेदीसाठी उत्साही वातावरण निर्माण झाले आहे.

लोकसंसद

## सार्वकालीन सर्वोत्कृष्ट फलंदाज चेतेश्वर पुजारा निवृत्त

'भारताची जर्सी घालणे, राष्ट्रगीत म्हणणे आणि प्रत्येक वेळेस मैदानात उतरल्यावर सर्वोत्तम प्रयत्न करणे या गोष्टी शब्दात मांडणे अशक्य आहे.' अशा भावपूर्ण शब्दांत कृतज्ञता व्यक्त करत भारताचा सार्वकालीन सर्वोत्कृष्ट फलंदाज चेतेश्वर पुजाराने आपल्या १५ वर्षांच्या दीर्घ काळाच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आणि भारतीय क्रिकेटला अलविदा केला. भारताच्या ९३ वर्षांच्या कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील केवळ १४ खेळाडूंना १०० कसोटी सामन्यांचा टप्पा ओलांडता आला. त्यापैकीच एक म्हणजे चेतेश्वर पुजारा. त्याने १०३ कसोटी सामन्यात ४३.६० च्या सरासरीने ७१९५ कसोटी धावा केल्या. त्यात १९ शतके आणि ३५ अर्धशतकांचा समावेश असून सर्वाधिक कसोटी धावा करणारा तो भारताचा आठवा फलंदाज आहे.




अत्यंत शांतचित्ताने खेळत खेळपट्टीवर ठाण मांडणाऱ्या चेतेश्वर पुजाराने आपल्या चिवट बचावाच्या जोरावर भारताला अनेकदा जिंकून दिले आहे. सुरुवातीपासूनच संथ, दीर्घ खेळी आणि संयम या गोष्टींसाठी ओळखल्या गेलेल्या चेतेश्वर पुजाराला एकदिवसीय आणि टी-२० सारख्या झटपट खेळल्या जाणाऱ्या क्रिकेटमध्ये फारशी संधी मिळू शकली नाही. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये तो २७८ सामने खेळला आणि ५१.८२ सरासरीसह त्याने २१३०१ धावा केल्या आहेत. त्यात ३५२ धावा त्याची सर्वोच्च धावसंख्या असून त्याने ६६ शतके आणि ८१ अर्धशतके झळकावली आहेत. आता तो समालोचक म्हणून नवी इनिंग सुरु करतो आहे, त्यासाठी त्याला शुभेच्छा!

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

# कहाणी हरतालिकेची

भाद्रपदातील शुक्ल पक्षाच्या तृतीयेवर हरतालिकेचे व्रत दरवर्षी केले जाते. यावेळी २६ ऑगस्ट रोजी हरतालिकेचे पूजन आहे. भाद्रपद शुल्क तृतीयेला हे व्रत केले जाते. भगवान शंकर पती म्हणून मिळावे, यासाठी पार्वती देवीने हे व्रत केले होते. तेव्हापासून लग्न झालेल्या महिलांपासून ते कुमारिका देखील दरवर्षी हरितालिकेचे व्रत न चुकता करतात. निर्जळी किंवा न खाता हरितालिकेचे व्रत करण्याची प्रथा आहे. सौभाग्यप्राप्तीसाठी हे व्रत केले जाते. एके दिवशी शंकरपार्वती कैलास पर्वतावर बसली होती. पार्वतीनं शंकराला विचारलं, महाराज सर्व व्रतात चांगलं असं व्रत कोणते? श्रम थोडे आणि फळ पुष्कळ असं एखादं व्रत असलं तर मला सांगा. मी कोणत्या पुण्याईनं आपले पदरी पडले हेही मला सांगा. तेव्हा शंकर म्हणाले, जसा नक्षत्रांत चंद्र श्रेष्ठ, ग्रहात सूर्य श्रेष्ठ, चार वर्णात ब्राह्मण श्रेष्ठ, देवात विष्णू श्रेष्ठ, नद्यांत गंगा श्रेष्ठ त्याप्रमाणे हरितालिका हे व्रत सर्वांत श्रेष्ठ आहे. ते तुला सांगतो. तेच तू पूर्वजन्मी हिमालय पर्वतावर केलंस आणि त्याच पुण्यानं तू मला प्राप्त झालीस, ते व्रत ऐक.

हे व्रत भाद्रपद महिन्यातील पहिल्या तृतीयेला करावं. ते पूर्वी तू कसं केलंस ते मी तुला आता सांगतो. तू लहानपणी मी तुला प्राप्त व्हावं म्हणून मोठं तप केलंस. चौसष्ट वर्षं तर झाडाची पिकली पानं खाऊन होतीस. थंडी, पाऊस, ऊन ही तिन्ही दुःख सहन केलीस. हे तुझे श्रम पाहून तुझ्या बापाला फार दुःख झालं व अशी कन्या कोणाला द्यावी? अशी त्याला चिंता पडली. इतक्यात तिथं नारदम ुनी आले. हिमालयानं त्यांची पूजा केली व येण्याचं कारण विचारलं. तेव्हा नारद म्हणाले, तुझी कन्या उपवर झाली आहेत ती विष्णूला द्यावी, तो तिचा योग्य नवरा आहे. त्यांनीच मला तुजकडे मागणी करण्यास पाठविलं आहे म्हणून इथं मी आलो आहे. हिमालयाला मोठा आनंद झाला. त्यांने ही गोष्ट कबूल केली. हे व्रत भाद्रपद महिन्यातील पहिल्या तृतीयेला करावं. ते पूर्वी तू कसं केलंस ते मी तुला आता सांगतो. तू लहानपणी मी तुला प्राप्त व्हावं म्हणून मोठं तप केलंस. चौसष्ट वर्षं तर झाडाची पिकली पानं खाऊन होतीस. थंडी, पाऊस, ऊन ही तिन्ही दुःख सहन केलीस. हे तुझे श्रम पाहून तुझ्या बापाला फार दुःख झालं व अशी कन्या कोणाला द्यावी? अशी त्याला चिंता पडली. इतक्यात तिथं नारदमुनी आले. हिमालयानं त्यांची पूजा केली व येण्याचं कारण विचारलं.

तेव्हा नारद म्हणाले, तुझी कन्या उपवर झाली आहेत ती विष्णूला द्यावी, तो तिचा योग्य नवरा आहे. त्यांनीच मला तुजकडे मागणी करण्यास पाठविलं आहे म्हणून इथं मी आलो आहे. हिमालयाला मोठा आनंद झाला. त्यांने ही गोष्ट कबूल केली. नंतर नारद तेथून विष्णूकडे गेले. नारद गेल्यावर तुझ्या बापानं ही गोष्ट तुला सांगितली, ती गोष्ट तुला रुचली नाही. तू रागावलीस असं पाहून तुझ्या सखीनं रागावण्याचं कारण विचारलं, तेव्हा तू सांगितलंस, महादेवावाचून मला दुसरा पती करायचा नाही, असा माझा निश्चय आहे, असं असून माझ्या बापानं मला विष्णूला देण्याचं कबूल केलं आहे, ह्याला काय उपाय करावा? मग तुला तुझ्या सखीनं एका घोर अरण्यात नेलं. तिथं गेल्यावर एक नदी दृष्टीस पडली. जवळच एक गुहा आढळली. त्या गुहेत जाऊन तू उपास केलास. तिथं माझं लिंग पार्वतीसह स्थापिलस. त्याची पूजा केलीस. तो दिवस भाद्रपद शुद्ध तृतियेचा होता. रात्री जागरण केलंस. त्या पुण्यानं इथलं माझं आसन हाललं. नंतर मी तिथं आलो, तुला दर्शन दिलं. आणि वर मागण्यास सांगितलं तू म्हणाली, तुम्ही माझे पती व्हावं, याशिवाय दुसरी इच्छा नाही! नंतर ती गोष्ट मी मान्य केली. स्त्रियांचं सौभाग्य वाढतं ह्या दिवशी बायकांनी जर काही खाल्लं तर सात जन्म वंध्या होतात. दळिद्रं येतं व पुत्रशोक होतो. कहाणी ऐकल्यावर सुवासिनींना यथाशक्ति वाण द्यावं. दुसरे दिवशी उत्तरपूजा करावी आणि व्रताचं विसर्जन करावं.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२६ ऑगस्ट

१) श्रीम. संजीवनी अरूण रानडे अलिबाग, २६-८-१९५१
२) श्री. यशवंत बाळकृष्ण करंजावकर अलिबाग, २६-८-१९४७
३) श्रीम. उषा कमलाकर पाटील गोंधळपाडा, वेश्वी, २६-८-१९४५
४) श्रीम. छाया प्रकाश जोशी अलिबाग, २६-८-१९४८
५) श्रीम. कविता शरद जगे अलिबाग, २६-८-१९५३
६) श्री. अनंत वामन सोमण चेंढरे, २६-८-१९५२
७) श्रीम. प्रमिला अविनाश घरत चौल, अलिबाग, २६-८-२०२२
८) ॲड. विलास कृष्णाजी नाईक श्रीबाग, २६-८-१९६२

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालयाचा संथ कारभार

## अत्यावश्यक सेवेचे तीनतेरा, डॉक्टरांसह कर्मचारीदेखील अपुरे

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये अतिशय संथ गतीने कारभार सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. एखादा रुग्ण अत्यावस्थ असल्यास त्याला तातडीने दाखल करून घेताना, रुग्णालयातील वेगवेगळी प्रोसिजर पूर्ण होईपर्यंत अर्धा ते पाऊण तासाचा वेळ वाया जात आहे. सध्या श्रीवर्धन तालुक्यामध्ये वायरल तापाच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. गौरी गणपतीच्या सणासाठी आलेले कोकणवासीदेखील आजारी पडले आहेत. सर्वच रुग्ण शासकीय इस्पितळामध्ये उपचार घेण्यासाठी येत नसल्याने




त्याचा निश्चित आकडा समजू शकत नाही. परंतु, खासगी दवाखान्यांमध्येदेखील खूप मोठ्या प्रमाणावर रुग्णांची संख्या पाहायला मिळत आहे.

ताप, सर्दी, खोकला, अंग दुखणे इत्यादी आजार मोठ्या प्रमाणावर उद्भवत आहेत. श्रीवर्धन येथील उपजिल्हा रुग्णालयात गेल्यानंतर केस पेपर काढण्यासाठीच अनेकवेळा ऑनलाइन सिस्टीम बंद असल्याचे दिसून येते. तसेच या ठिकाणी विविध आजारांसाठी डॉक्टर असूनसुद्धा अनेकवेळा डॉक्टर त्यांच्या ड्युटीच्या वेळी कर्तव्यावर हजर नसल्याचे दिसून येते. रविवारी दुपारी एका रुग्णाला ताप आल्यामुळे रुग्णालयात नेण्यात आले होते. परंतु, सदर ठिकाणी असलेल्या आधी परिचारिकेने ताप येणाऱ्या रुग्णाला गोळ्या देऊन उद्या सकाळी येण्यास सांगितले. यावेळीदेखील त्या ठिकाणी कोणीही डॉक्टर उपस्थित नसल्याचे दिसून आले.

अनेकवेळा एखादा रुग्ण अत्यवस्थ असेल तर त्याला तातडीने उपचाराची गरज असते. परंतु, त्या ठिकाणच्या कागदी घोडे नाचवण्यामध्येच नागरिकांचा वेळ जास्त वाया जातो. सध्या तापाचे रुग्ण जास्त असल्यामुळे बहुतांश रुग्णांना रक्त तपासण्याचा सल्ला देण्यात येतो. परंतु, या ठिकाणी रक्ताचे सॅम्पल घेण्यासाठीसुद्धा कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी आहे. तसेच सकाळी १० ते दुपारी १२ एवढ्याच वेळात रक्त तपासणीसाठी घेतले जाते. त्यानंतर येणाऱ्या रुग्णांना खासगी रक्त तपासणी करावी लागते किंवा दुसऱ्या दिवसापर्यंत वाट पाहावी लागते.

याबाबत जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रफुल्ल पावसेकर यांच्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

### प्रशासनाचे दुर्लक्ष

श्रीवर्धनचे उपजिल्हा रुग्णालय अतिशय सुसज्य करण्यात आलेले आहे. परंतु, या ठिकाणी असलेल्या प्रशासनाचा ढिसाळ कारभार व कर्मचाऱ्यांची कमी संख्या यामुळे रुग्णालयाचा कारभार संथ गतीने चालला आहे की काय? असेच दिसून येते. याबाबत श्रीवर्धनच्या आमदार व राज्याच्या बाल विकास व महिला मंत्री अदिती तटकरे यांनी तातडीने लक्ष द्यावे व या ठिकाणच्या रुग्णांना योग्य प्रकारे सुविधा उपलब्ध होतील याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### सुविधांसह स्वच्छतेची ऐसीतैसी

रुग्णालयात व रुग्णालयातील स्वच्छतागृहांमध्ये स्वच्छतेचीदेखील ऐसीतैसी झालेली पाहायला मिळते. रुग्णांना बेडवरती अंथरण्यासाठी देण्यात येणाऱ्या बेडशीटदेखील अनेकवेळा अस्वच्छ असतात. या बेडवरती बेडशीट घालण्यासाठी रुग्णाच्या नातेवाईकांच्या हातात दिली जाते. रुग्णालयाचा कोणताही कर्मचारी बेडशीट घालण्यासाठी उपस्थित नसतो. काही अत्यावश्यक रुग्णांना वरच्या मजल्यावर घेऊन जायचे असल्यास त्या ठिकाणी बॉयची संख्या देखील कमी आहे. त्यामुळे रुग्णाच्या नातेवाईकांनाच सदर रुग्णाला घेऊन वर जावे लागते. उपजिल्हा रुग्णालयात दाखल केलेल्या रुग्णांसोबत एक नातेवाईक उपस्थित असतो. परंतु, सदर माणसाला बसण्यासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था रुग्णालयात नाही.

# पालक माता, विद्यार्थी संवाद कार्यक्रम

**| नेरळ | प्रतिनिधी |**

संस्कारमय शाळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेरळ गावातील विद्या विकास मंदिर शाळेत विद्यार्थी आणि त्यांचे पालक असलेल्या माता यांच्या संवाद साधण्याचा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. मातृदिनाच्या निमित्ताने आगळावेगळा कार्यक्रम विद्या मंदिर मंडळाने सादर करून पालक वर्गाची संस्थेबद्दल जवळीक निर्माण करण्याचा प्रयत्न केला.



कर्जत तालुक्यातील नेरळ येथील विद्या विकास मंडळ संचालित विद्या विकास मंदिर या शाळेत मातृदिनाचा समारंभ शाळेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमांतर्गत भारतीय संस्कृती आणि संस्कार यांचे महत्व विविध कार्यक्रमातून दर्शविण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या मातेप्रती असलेल्या भावना आणि प्रेम आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या मातांचे औक्षण करून त्यांना वंदन केले आणि त्यांचा आशीर्वाद घेतला. औक्षण कार्यक्रमानंतर आई आणि मुलांच्या खेळांचा आनंद घेतला. यात मुलांनी आईच्या कपाळावर टिकली लावणे, आईने ग्लासात फुगा फुगवून तो मुलांकडे पास करणे आणि गाण्यांच्या तालावर नृत्य करत गाणे थांबले की बॉटल उचलणे असे मनोरंजक खेळ खेळले आणि त्यातून आनंद घेण्याचा प्रयत्न केला. या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना पाटील यांनी केले.



**पनवेलच्या कुंभार वाड्यामध्ये हरतालिका मूर्ती तयार करण्याची लगबग. (छायाचित्र : राजेश डांगळे)**

## सुवर्णकण



सिद्धी प्राप्त झाल्यानंतर त्या मोहात साधकाने गुंतून राहता कामा नये.
आपले ध्येय गाठण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करावा.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

# निबंध स्पर्धेत तनिष्का आपणकर प्रथम

**| रोहा | प्रतिनिधी |**

ज्ञानगंगा बहुविकलांग संस्था व रिसबूड परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या निबंध स्पर्धेत ३५ वर्षाच्या वयामध्ये मी स्वतःला काय खाऊ घालेन? या विषयावर इयत्ता आठवी ते दहावी गटासाठी आंतर शालेय निबंध स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत तालुक्यातील १४ शाळांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.



२१ ऑगस्ट रोजी या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला. या विषयाच्या अनुषंगाने भाटे सार्वजनिक वाचलानालय येथे बक्षीस वितरण कार्यक्रम पार पडला. यावेळी स्पर्धेतील प्रथम क्र.पटकविणारी जे.एम. राठी स्कूलची विद्यार्थिनी तनिष्का आपणकर हिला ५ हजार रु. रोख, प्रमाणपत्र व भेट वस्तू, द्वितीय क्र. पटकविणारी (द.ग.तटकरे माध्यमिक विद्यालय भालगाव) ची ऋतिका सावंत हिला ४ हजार रु. प्रमाणपत्र व भेट वस्तू तसेच, तृतीय क्र. पटकविणारी ग्रेगोरियन पब्लिक स्कूलची एंजल फर्नांडिस हिला ३ हजार रु. प्रमाणपत्र व भेटवस्तू त्याचप्रमाणे उत्तजनार्थ म्हणून मृण्यमयी दळवी (द. ग. तटकरे माध्यमिक विद्यालय कोलाड), संद्या मेहता (के.ई. एस. व्ही. पी.टी इंग्लिश स्कुल), दिव्या किर (रोहा पब्लिक स्कूल) अक्षरा ठाकूर (विरजोली हायस्कूल) यांना देखील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

# राज पवारचे युवक महोत्सवात यश

**| कोलाड | प्रतिनिधी |**

कोलाड येथील तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवे कोलाडचे संस्थेचे सचिव संदीपजी तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पाठवण्यात आलेल्या ५८ व्या अंतर महाविद्यालय युवक महोत्सव २०२५-२६ मुरुड येथील अंजुमन इस्लाम डिग्री कॉलेज येथे पार पडला. या युवक महोत्सवात राज नरेंद्र पवार (टी.वाय.बी.एस.सी) याने क्ले मॉडेलिंग या स्पर्धा प्रकारात उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवून महाविद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे.



विशेष म्हणजे गतवर्षीही या विद्यार्थ्याने याच स्पर्धा प्रकारांमध्ये उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले होते. अतिशय चातुर्याने ही मृदुकला त्यांने हाताळलेली आहे. या यशाचे रहस्य म्हणजे महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा गितू मोहन, डॉ. आमलपूरे सूर्यकांत, प्रा. रिया कोदे प्रा. कीर्ती राधाकृष्णन प्रा. प्राजक्ता शिंदे, प्रा. अश्विनी पवार यांनी मेहनत घेतली होती.

राजच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव संदीपजी तटकरे, सर्व संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास देशमुख, उपप्राचार्य नेहल प्रधान, कार्यालयीन अधीक्षक अमोल गोलीपकर, सर्व विभागाचे विभाग प्रमुख व प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कोमसापच्या अध्यक्षपदी संजय गुंजाळ



**| पनवेल | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील रोहा येथे झालेल्या कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याच्या सर्वसाधारण सभेमध्ये नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड झाली. त्यामध्ये अध्यक्षपदी संजय गुंजाळ, केंद्रीय जिल्हा प्रतिनिधी म्हणून गणेश कोळी तर उपाध्यक्षपदी पुरुषोत्तम मुळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच, कार्यवाह संजय होळकर, कार्याध्यक्षा- रेखा कोरे, कोषाध्यक्ष- एड.गोपाळ शेळके, जिल्हा समन्वयक- सुखद राणे तर कार्यकारिणी सदस्य धनंजय गद्रे, सुभाष कुडके, मच्छिंद्र म्हात्रे, रामजी कदम, प्रविता माने, रमेश धनावडे, गंगाधर साळवी, ज्योत्स्ना राजपूत, लवेंद्र मोकल तर महिला प्रमुख म्हणून संध्या दिवकर, युवाशक्ती प्रमुख - सिद्धेश लखमदे यांची निवड झाली. उर्वरित कार्यकारणीतील पदाधिकारी व सदस्यांची नावे लवकरच जाहीर करण्यात येणार आहेत.

# पनवेल-चिपळूण दरम्यान विशेष गाड्या

**| रोहा | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवाच्या काळात प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने यंदा विक्रमी ३८० गणपती विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या वर्षीपेक्षा २२ गाड्यांची वाढ करून यावर्षी अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

गणेशोत्सव २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान साजरा होणार असून गणेश फेस्टीव्हल स्पेशल गाड्या मात्र २२ ऑगस्टपासूनच मुंबई, पुणे, कोकण, पनवेल, चिपळूणसह विविध मार्गांवर धावू लागल्या आहेत.

यात पनवेल-चिपळूण दरम्यान ६ अनारक्षित विशेष गाड्या चालविण्याची घोषणाही मध्य रेल्वेने केली आहे. भाविकांना सुलभ व आरामदायक प्रवासाची सुविधा मिळावी हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

प्रवासी यूटीएस प्रणालीद्वारे मोबाईलवरूनच अनारक्षित डब्यांची तिकिटे काढू शकतात अशी सुविधाही मध्य रेल्वेकडून उपलब्ध करण्यात आली आहे. त्यामुळे तिकिटांसाठी आता लांबच लांब रांगेत उभे राहण्याची गरज नाही.



## श्रीफळांचे वाटप

**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरानमधील गणेशभक्तांना यावेळी एक पर्वणीच असून सढळ हाताने मोफत साहित्य देण्यासाठी दानशूर हात सरसावले आहेत. वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य वाटपाचा कार्यक्रम दोन दिवसांपासून सुरू आहे. याचा लाभ घरगुती गणेशोत्सव, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ घेत आहेत. सामाजिक कार्यकर्ते प्रमोद नायक आणि नरेश परदेशी यांच्या माध्यमातून गणेशभक्तांना गणेशपूजेसाठी पाच (नारळ) श्रीफळांचे वाटप करण्यात आले याचा गणेशभक्तांनी लाभ घेतला.

# तळाघर तंटामुक्ती अध्यक्षपदी संदेश मोरे

## उपाध्यक्षपदी संजय भगत यांची बिनविरोध निवड

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत तळाघर येथे पार पडलेल्या ग्रामसभेत संदेश मोरे यांची तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी, तर संजय भगत यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.



संदेश मोरे हे ग्रुप ग्रामपंचायत तळाघरचे माजी सरपंच होते. त्यांचा लोकांशी असलेला दांडगा जनसंपर्क तसेच सर्वांना सामावून सोबत नेण्याची वृत्ती यामुळे ते तंटामुक्ती अध्यक्ष पदाला योग्य न्याय देतील, असा विश्वास ग्रामस्थांनी यावेळी व्यक्त केला. गावात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध राहू, असा विश्वास नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनी व्यक्त केला. निवडीबद्दल अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## आनंद जोशी यांचा सन्मान

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धनचे ज्येष्ठ पत्रकार आनंद काशिनाथ जोशी यांना रायगड प्रेस क्लबचा २०२५ चा जीवन गौरव पुरस्कार मिळाला. याबद्दल त्यांना रविवारी (दि.२४) दि अण्णासाहेब सावंत को-ऑप.अर्बन बँक, महाडच्या वतीने बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन्मानित करण्यात आले.

## रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**| कर्जत | वार्ताहर |**

तालुक्यातील कशेळे येथील पुष्पम संस्कृती रिसॉर्टच्या वतीने माया रक्त केंद्र, बदलापूर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले हे कर्जत, खालापूर तालुक्यातील ५२१ वे रक्तदान शिबीर ठरले आहे.

पुष्पम संस्कृती रिसोर्ट कशेळे येथे करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी चिराग चोप्रा, सरफराज खान, अस्मिता कांबळे, विशाल विजापुरे, राजेश यादव, पवन मोडक, शदाब येसीन, राज गांधी, इरफान शेख, जयवंत म्हसे, डॉ. प्रशांत सदावर्ते, आमिर मणियार आदी उपस्थित होते.




# भारती पाटील यांचा सेवापूर्ती सन्मान

**| भाकरवड | प्रतिनिधी |**

अलिबाग तालूक्यातील देहेन गावच्या आरोग्य सेविका भारती भगवान पाटील यांचा सेवापुर्ती सोहळा खालापूर येथील लोहोप प्राथमिक आरोग्य केंद्रात पार पडला.

सर्वांना सहकार्य करणाऱ्या भारती पाटील आपल्या शिक्षणाच्या आधारे त्यांनी परिचारिका प्रशिक्षण घेऊन १९८९ पासून आरोग्य सेविका म्हणून जिजामाता हॉस्पिटल अलिबाग, पोलादपूर, पुरोहित हॉस्पिटल, पेण कामारली, वावंजा त्यानंतर लोहोप येथे आपली सेवा बजावली. त्यांनी ३५ वर्ष आपला कार्यकाळ पूर्ण करून लोहोप येथील वासांबे उपकेंद्र आरोग्य सेविका म्हणून सेवानिवृत्त झाल्या. पाटील यांनी कोविड काळात भीतीच्या वातावरणात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अविरतपणे सेवा केली होती.

## म्हसळ्यातील बाजारपेठा गजबजल्या | मिठाई, सजावटीच्या साहित्यांना मोठी मागणी

# गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरिक सज्ज

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

**कोकणात गणेशोत्सवाचा जल्लोष अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही 'गणपती बाप्पा मोरया' च्या गजरात हा उत्सव साजरा करण्यासाठी नागरिक सज्ज झाले आहेत. म्हसळ्यातील बाजारपेठा सध्या गजबजल्या असून गणेशमूर्तीपासून ते सजावटीच्या साहित्यापर्यंत, मिठाईपासून ते ढोलकीच्या साहित्यापर्यंत मोठी मागणी वाढू लागली आहे.**

गावागावांत मातीच्या, शाडूच्या, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तिची विक्री सुरू झाली असून कारागिरांना



यावर्षी चांगला प्रतिसाद मिळत आहे. पर्यावरणपूरक मूर्तीनाही नागरिकांची पसंती लाभत आहे. सजावटीच्या वस्तू, रंगीबेरंगी रोषणाई, तोरणं, कागदी पुलांची सजावट, तसेच पूजेच्या साहित्याच्या खरेदीसाठी नागरिकांची गर्दी दिसून येत आहे. मिठाईचे दुकाने, खासकरून मोदक विक्री दुकानावर ग्राहकांची मोठी गर्दी दिसून येत आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मुंबई, ठाणे, पुणे अशा शहरांमधून कोकणवासीय मोठ्या संख्येने गावी परतण्यास सुरुवात केली आहे. एस.टी. बसस्थानकांवर स्थानकांवर गर्दी वाढली आहे. खासगी वाहनांच्या वाहतुकीतही वाढ झाली असून प्रमुख महामार्गावर पोलीस निरीक्षक संदिप कहाले यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिसांनी विशेष बंदोबस्त ठेवला आहे. प्रशासनाच्या वतीने गणेशोत्सव शांततेत पार पडावा यासाठी आवश्यक ती तयारी सुरू आहे.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सण नसून कोकणवासीयांच्या भावविश्वाशी जोडलेला सांस्कृतिक सोहळा आहे. घराघरांतून गणपती बाप्पाचे स्वागत करण्याची लगबग सुरू असताना, पुढील काही दिवसांत हा उत्साह शिगेला पोहोचणार यात शंका नाही. वर्षभर खेड्यापाड्यातील घरे बंद असतात; परंतू गणपती असा सण आहे कि खेड्यातील सर्वच्या सर्व कोकणवासीय आपापल्या गावी पोचतात आणि गावागावात नवचैतन्य तयार होते.

### सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत

सार्वजनिक मंडळांच्या मंडपांना परवानग्या, विद्युत सुरक्षितता तपासणी, वाहतूक नियंत्रण, आरोग्यविषयक सुविधा या सर्व बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. तर पोलीस विभागाने सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत केली आहे.

# बाप्पाच्या आगमनासाठी सारेच सज्ज

## गाव वाड्यांवर नवचैतन्य, प्रबोधनात्मक व लोकोपयोगी उपक्रम

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

**कोकणातील महत्त्वाचा सण गणेशोत्सव अवघ्या काही तासांवर येऊन ठेपला आहे. जिल्ह्यात गणेशोत्सवाची धामधूम सुरू झाली आहे. येथील बाजारपेठ सजल्या आहेत. गाववाड्यांमध्ये गणेशोत्सवाच्या तयारीची लगबग दिसत आहे.**

खेड्यापाड्यातील व वाडीवस्तीवरील बहुसंख्य लोक पुणे मुंबईसह इतर शहरात कामानिमित्त राहतात. मात्र, गणेशोत्सवाला आवर्जून गावी येतात. त्यामुळे इतर दिवशी ओस पडलेली गावे व वाड्यांमध्ये आता नवचैतन्य आले आहे. शिवाय येथील अनेक मंडळे गणेशोत्सवात विविध प्रबोधनात्मक व लोकोपयोगी उपक्रम देखील राबवतात. स्थानिक बाजारपेठ विविध वस्तूंनी बहरल्या आहेत.



वर्षभर बंद असलेल्या काही घरांचे टाळे आता उघडले आहेत. तसेच एकांतात राहणाऱ्या वृद्ध मंडळींना देखील आपली मूल, नातवंडे व नातेवाईक घरी आल्याने आनंद होतो. काही दिवस गणेशोत्सवाच्या सुट्ट्या लागल्यामुळे लहानगे गावात आनंदाने बागडतात व खेळतात.

तरुण व मोठे गावाच्या आजूबाजूच्या जंगल व निसर्गाचा आनंद घेतांना दिसतील तर कुणी जुन्या मित्रमंडळींना भेटतील. गावागावात रेलचेल दिसू लागली आहे. यामुळे गावांना खऱ्या अर्थाने गावपण आले आहे. गावे वाड्या जणूकाही उजळून निघाल्या आहेत. आर्थिक व्यवहारांना देखील गती आली आहे.

प्रत्येकजण गणरायाच्या स्वागतासाठी आतुर झालेला दिसत आहे. बाप्पाच्या स्वागताची जिकडेतिकडे जय्यत तयारी सुरू झाली आहे. गणरायाची प्रतिष्ठापना झाल्यावर घराघरात गणराया समोर जागरणे आरत्या होतात. काही वेळेस पत्ते खेळले जातात. मात्र, सुधागड तालुक्यातील वावे गावातील तरुण गणरायासमोर व्हॉलीबॉल व इतर स्पर्धा घेतात. तर ग्रंथालयात पुस्तके वाचण्यासाठी तरुण व मुले जमतात. अशा प्रकारे गणेशोत्सवात तरुणाईला विधायक कामात गुंतवले जाते. या उपक्रमामुळे गावातील सर्व तरुण मागील काही वर्षांपासून एकत्र येत आहेत. एकमेकांशी विचार विनिमय करु लागली आहेत. तरुण एकत्र आल्याने दुरावलेली मने जुळून आली. या उपक्रमामुळे गणपतीमध्ये एक नवीन आनंदाची आणि एकात्मतेची ऊर्जा गावात पसरते.

गणेशोत्सव लोकमान्य टिळकांनी ज्या हेतुन सुरु केला तो हेतु समाजातुन कुठेतरी भरकटत चालला आहे. त्यामुळे सर्व तरुण व ग्रामस्थ एकत्र येणे आणि विधायक समाज घडवणे हा या मागच हेतु आहे असे. वावे गावातील तरुण केतन म्हसके यांनी सांगितले.

यावेळी सुधागड तालुका मराठा समाज अध्यक्ष धनंजय साजेकर यांनी आवर्जून सर्वांना आवाहन केले आहे की गणरायासमोर कोणीही जुगार खेळू नये तसेच डीजेचा आवाज आणि नाचगाणी करू नये. यामुळे समाजात परिवर्तन होताना दिसत आहे.

लहानग्यांनाच जर पर्यावरण स्नेही व पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्व पटवून दिले तर आपोआपच पुढची पिढी पर्यावरणाप्रती अधिक सजग होईल. या उद्देशानेच लहानग्यांसाठी येथे मातीचे गणपती बनविण्याची कार्यशाळेचे आयोजन तज्ज्ञ मार्गदर्शक नेहा तारकर देशमुख आणि अभिषेक देशमुख यांनी केले आहे.

घरगुती गणपती सजावट माध्यमातुन प्लास्टिक विरोधी संदेश, स्त्रीभ्रूणहत्या रोखणे, वृक्षलागवड, 'बेटी पढाओ' आदी संदेश देणारे देखावे केले जातात तर काही ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांची प्रतिकृती बनवून गडकिल्ले संवर्धनचा जागर करुन समाजाचे प्रबोधन करत आहेत.

> **जिल्ह्यात काही ठिकाणी सार्वजनिक व घरगुती गणेशोत्सवात चमत्कार प्रयोग सादरीकरण, सर्पविज्ञान, अंधश्रध्दानिमुर्लन आदी विधायक व प्रबोधनात्मक कार्यक्रम त्या-त्या शाखांमार्फत राबविले जातात. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळतो. यावर्षी देखील असे कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. दरवर्षीप्रमाणे या देखिल वर्षी गणराया समोर प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविणार आहोत. याचा फायदा समाजप्रबोधनासाठी होणार आहे.**
> **- मोहन भोईर**
> **महा अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष**



बाप्पाचे आगमन दोन दिवसावर आल्याने पनवेलच्या भाजी मार्केटमध्ये पूजेचे साहित्य, फळ, फुले खरेदी करताना नागरिकांची गर्दी दिसत आहे.
(छायाचित्र : राजेश डांगळे)

## चार बांगलादेशीयांना ताब्यात

| पनवेल | प्रतिनिधी |

नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या आदेशानुसार पनवेल शहर पोलिसांनी घेतले चार बांगलादेशीयांना ताब्यात घेतले आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांनी आखलेल्या विशेष मोहिमेत प्रतिबंधक विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र घेवडेकर व त्यांच्या पथकाने खुकुमिन अख्तर लिमा, वय २९ वर्ष, सध्या रा. अकुर आंगण बिल्डींग, रूम नं.२०१, गणपती मंदिराजवळ, सेक्टर आर/४, करंजाडे, खादिजा बेगम वय ४० वर्ष, सध्या रा. सेक्टर १९ येथील झोपडपट्टीत, कोपरखैरणे, अंजिला खातुन वय ५५ वर्ष, सध्या रा. सेक्टरयेथील झोपडपट्टीत, कोपरखेरणे, हानिफ शेख वय १३ वर्ष सध्या रा. सेक्टर १९ येथील झोपडपट्टीत, कोपरखैरणे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाई मुळे बेकायदेशीररित्या पनवेल परिसरात वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशीयांचे धाबे दणाणले आहेत.

## ई-घंटागाड्या बंद अवस्थेत



| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

कचरा संकलनासाठी श्रीवर्धन तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीत जानेवारी २०२५ साली प्रत्येकी एक इलेक्ट्रॉनिक घंटागाड्या (ई-रिक्षा) रायगड जिल्हा परिषदेने पुरवल्या आहेत. ग्रामीण भागातील कचरा व्यवस्थापन सुधारण्यासाठी आणि स्वच्छतेचा प्रश्न सोडवण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने पुढाकार घेत १४ वा वित्त आयोग आणि नाविन्यपूर्ण योजनेतून निधी उपलब्ध करून ई-घंटागाड्या खरेदी केल्या.

तालुक्यातील रानवली, भोस्ते, वाळवटी, शेखाडी व बोर्लीपंचतन या ग्रामपंचायतीसाठी ई-घंटागाड्या देताना जिल्हा परिषदेने तालुक्याची भौगोलिक परिस्थिती न बघता ई रिक्षा दिल्याचे निदर्शनास येते. अनेक ग्रामपंचायतींचे कचरा डेपो हे डोंगर वाटेवर आहेत. इलेक्टॉनिक रिक्षांची कुवत बघता या रिक्षा चढावात योग्य वेगाने चढू शकत नाहीत परिणामी, चालकाला कचऱ्याने भरलेली ई-घंटागाडी त्याच मार्गाने ग्रामपंचायतीच्या आवारात आणून उभी करावी लागते. वजनाने हलकी व चालकासह एका सफाई कर्मचार्याला केबीनमध्ये बसण्यास अपुरी जागा, कचरा संकलन करण्यासाठी अपुरी जागा अशा या त्रुटींमुळे ई-घंटागाडी ग्रामपंचायतींच्या आवारात बंद अवस्थेत दिसत आहेत.

ई-घंटागाड्या करीता बॅटरी चार्जिंग सुविधा, दुरुस्ती आणि देखभालीसाठी आवश्यक साधने ग्रामपंचायतीकडे उपलब्ध नाहीत. ई-रिक्षा ग्रामपंचायतीना दिल्यावर त्यांच्या वापराबाबत आणि देखभाल बाबत जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायतीमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने ई-रिक्षा शोभेची वस्तू झाली आहे.

## निजामपूर मोहल्ल्यातील रस्त्याचे काम सुरु

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील निजामपूर मस्जिद मोहल्ला येथील खचलेल्या रस्त्याबाबत दैनिक कृषीवल वृत्तपत्रामध्ये वृत्त प्रसिद्ध झाले होते. या वृत्ताची दखल निजामपूर ग्रामपंचायतीने घेऊन या रस्त्याच्या कामास सुरुवात केली आहे. मोहल्ल्यातील सदर रस्त्याच्या कामास सुरुवात झाल्याने ग्रामस्थ लियाकत जालगावकर व सहकाऱ्यांनी तसेच जालगावकर कुटुंबीयांनी दैनिक कृषीवल वृत्तपत्राचे मनापासून आभार मानले आहेत.



कृषीवल इफेक्ट

तालुक्यातील निजामपूर मोहल्ल्यातील खचलेला हा रस्ता रायगडकडे जात असुन या रस्त्याची समस्या अत्यंत बिकट होती. त्यामुळे या रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण होत होता. शिवाय ही वाहने जालगावकर यांच्या संरक्षक भिंतीला (कंपाऊंड वॉल) घासून जात असल्याने कंपाऊंड वॉलचे नुकसान होण्याची शक्यता होती. तसेच या मार्गावरून जाणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांनाही या जाळ्यांमुळे दुखापत होण्याची शक्यता होती. या प्रश्नाकडे भागातील कोणीच लोकप्रतिनिधी अथवा ग्रामपंचायत लक्ष देत नसल्याने ग्रामस्थ लियाकत जालगावकर यांनी सदर समस्येबाबत ग्रामपंचायतीला जुलै २०२५ मध्ये सुरवातीला लेखी स्वरूपात तक्रार अर्ज दिला होता. परंतु महिना उलटूनही या समस्येकडे कोणी लक्ष देत नव्हते. या समस्येबाबत जालगावकरांनी प्रसार माध्यमांजवळ संपर्क साधून सदर समस्येबाबत आंदोलन छेडण्याचा इशारा दिला होता. या बाबतचे वृत्त दैनिक कृषीवलमध्ये प्रसिद्ध झाले होते. या वृत्ताची दखल निजामपूर ग्रामपंचायतीने घेऊन मोहल्ल्यातील या रस्त्याच्या कामाला अखेर सुरुवात केली असून लवकरच हे काम मार्गी लागणार आहे.

## नागोठण्यात शांतता समितीची सभा

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठणे पोलीस ठाण्यात शुक्रवार (दि.२२) ऑगस्ट रोजी शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. आगामी गणेशोत्सव व ईद-ए मिलाद सणांच्या अनुषंगाने नागोठणे पोलीस ठाणे हद्दीतील गणेशोत्सव मंडळ अध्यक्ष, शांतता कमिटी सदस्य, मोहल्ला कमिटी सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, पोलीस पाटील, यांची बैठक



सपोनि सचिन कुलकर्णी यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. यावेळी सचिन कुलकर्णी यांनी उपस्थितांना अनेक महत्त्वपूर्ण सूचना केल्या. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक नरेश थळकर, स्वप्निल भालेराव, अथर्व पाटील, विलास चौलकर, अकलाख पानसरे, लसिराज पानसरे, ज्ञानेश्वर साळुंखे, इम्रान पानसरे, गणेश घाग, प्रमोद नागोठणेकर, नंदा गायकवाड, निलोफर पानसरे, कांचन शेळके, के. के. कुथे, अदिती ठाकूर, महेश शिरसे, विजय पाटील, वैजयंती गदमले, वैशाली गायकर, चैत्राली झोलगे, मुजफ्फर कडवेकर, वसीम बोडेरे, संतोष कावेडिया आदी मान्यवरांसह नागरिक उपस्थित होते.

## पोलिसांचे दंगा काबू अभियान

| उरण | प्रतिनिधी |

गणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई आयुक्तालय क्षेत्रामधील सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. उरण, न्हावा शेवा, मोरा सागरी पोलिसांनी दंगा काबू अभियान राबविण्यास उरणात सुरुवात केली आहे. याचाच भाग म्हणून शुक्रवार व शनिवार या दोन दिवसांमध्ये मॉकड्रिल व दंगा काबूच्या माध्यमातून सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. नवीमुंबई पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी उरण शहरात मॉकड्रिल घेण्यात आले. तसेच शनिवारी दंगा काबू योजनेची उरण, न्हावाशेवा व मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या विद्यमानाने उरण एसटी स्टॅण्ड, चारफाटा, उरण या ठिकाणी रंगीत तालीम अभियान घेण्यात आले. सदर दंगा काबू योजना रंगीत तालीममध्ये उरण पोलीस ठाणे ४ सपोनि/पोउपनिरी, ३० पोलीस अंमलदार, न्हावाशेवा पोलीस ठाणेचे १ पोउपनिरी, १३ पोलीस अंमलदार तसेच मोरा पोलीस ठाणे येथील १ पोउपनिरी, १० पोलीस अंमलदार यांच्यासह द्रोणागिरी सिडको अग्निशामक विभागाकडील अग्निशामक वाहन त्यावर १ अधिकारी आणि ५ कर्मचारी व इंदिरा गांधी हॉस्पिटल येथील १ रुग्णवाहिका व २ कर्मचारी उपस्थित होते.

**गणेशोत्सवनिमित्ताने १६ डब्यांची गाडी धावणार** | **छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मडगाव प्रवास**

# वंदे भारत एक्सप्रेस कोकणात दाखल

| रोहा | प्रतिनिधी |

**गणेशोत्सवासाठी कोकणला जाणाऱ्या प्रवाशांसाठी एक अत्यंत आनंदाची बातमी आहे. सध्या आठ डब्यांची धावणारी मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मडगाव ही वंदे भारत एक्सप्रेस (२२२२९/२२२३०) आता दुप्पट क्षमतेने म्हणजेच १६ डब्यांची गाडी कोकणात दाखल झाली. ही गाडी रोहा रेल्वे स्टेशनहुन सोमवार (दि.२५) ऑगस्ट रोजी सकाळी ८ वा. जलदगतीने कोकणाच्या दिशेने रवाना झाली.**

मुंबई-मडगाव वंदे भारत एक्सप्रेस सुरू झाल्यापासूनच या गाडीला प्रवाशांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. ही गाडी नेहमीच



पूर्ण क्षमतेने धावत असल्याने कोकण विकास समितीने वेळोवेळी ही गाडी १६ किंवा २० डब्यांची चालवावी अशी मागणी केली होती. मागील काही महिन्यांपासून सुरू असलेल्या लेखी पाठपुराव्यानंतर अखेर या मागणीला यश मिळाले आहे.

रेल्वे अभ्यासक अक्षय महापदी यांच्या मतानुसार, गणेशोत्सवातील गर्दी पाहता १६ डब्यांच्या रेकसह तीन दिवस तर आठ डब्यांचा रेक वापरून तीन दिवस असे सहा दिवस वंदे भारत एक्सप्रेस चालवणे रेल्वेला शक्य आहे.

दरम्यान, गणेशोत्सव आठ ऐवजी सोळा डब्यांची वंदे भारत एक्सप्रेस चालवण्याचा निर्णय कोकणातील प्रवाशांची मागणी आणि गर्दी लक्षात घेता गणेशोत्सवात महत्त्वाचा ठरला आहे. यामुळे आता अनेक प्रवाशांना वंदे भारत एक्सप्रेसचे तिकीट बुकिंग करणे सोपे होणार आहे. आठ ऐवजी सोळा डब्यांची वंदे भारत एक्सप्रेस धावणार असल्याने वंदे भारत एक्सप्रेसची वेटिंग वर तिकीट असलेल्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. गाडीला रायगड जिल्ह्यातील पनवेल नंतर थेट चिपळूण येथे थांबा देण्यात आला आहे.

### गणेशोत्सवासाठी विशेष सेवा

**२५ ते ३० ऑगस्ट २०२५ या कालावधीत ही गाडी आठ ऐवजी १६ डब्यांसह धावणार आहे. यामुळे मुंबई-गोवा प्रवासासाठी वंदे भारत एक्सप्रेसमध्ये अधिक जागा उपलब्ध होणार असून गणेशोत्सवातील वाढती गर्दी कमी करण्यास मदत होईल. या सहा दिवसांत वंदे भारत एक्सप्रेसच्या डाऊनच्या तीन आणि अपच्या तीन अशा एकूण सहा फेऱ्या या १६ डब्यांच्या रेकने होणार आहेत.**

## निवडक



### सजावटीचे साहित्य महागले

**पनवेल** : गणपती बाप्पाचे आगमन अवघ्या काही तासावर आल्याने बाजारात खरेदीसाठी झुंबड उडाली आहे. सजावटी साहित्याचे दर २० ते २५ टक्के वाढूनही खरेदीचा जोर कायम असल्याचे चित्र दिसून आले. यंदाच्या वर्षी पनवेल परिसरातील बाजारपेठा विविध सजावटीच्या वस्तूंनी गजबजलेल्या आहेत. शहरातील ठिकठिकाणी दुकानात सजावटीच्या साहित्याच्या खरेदीसाठी गर्दी झालेली आहे. चायना वस्तूंची जास्त विक्री होत आहे. वेगवेगळे सुंदर मखर विक्रीस उपलब्ध आहेत. साहित्य महाग झाले असले तरी लाडक्या बाप्पाच्या सजावटीसाठी साहित्य खरेदी करण्यासाठी येथील दुकानांत ग्राहकांनी गर्दी केल्याचे दिसून आले. काही दुकान मालकांनी विविध वस्तूंवर सवलती जाहीर केल्याने त्यांच्याकडे ग्राहक अधिक आकर्षित होत आहेत. पूजेचे साहित्य, सजावटीचे साहित्य, पडदे, फुलांचे हार, रंगीबेरंगी तोरण, विजेसाठी लागणारे साहित्य दीपमाळा अशा विविध वस्तू किफायतशीर दरात उपलब्ध आहेत. हार व फुलमाळा ६० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत, छोट्या मंडपाचे पडदे ६० रुपयांपासून, तर सजावटीचे साहित्य ५०० रुपयांपासून पुढे अशा असा दर आहे.

### अल्पवयीन तरुणीचे अपहरण

**पनवेल** : पनवेल तालुक्यातील हेदुटणे येथे राहणाऱ्या १६ वर्षीय तरुणीचे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून तिचे अपहरण केल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पुजा हिरामण उघडा, वय १६ वर्षे असे तरुणीचे नाव असून रंग-गव्हाळ, उंची पाच फुट, डोळे काळे,



केस काळे लांब, नाक-सरळ व टोचलेले, अंगात पांढऱ्या रंगाचे पट्टे असलेला टीशर्ट व काळ्या रंगाची फुल पॅन्ट, भाषा मराठी, हिंदी व इंग्रजी बोलते, सोबत काळ्या रंगाची सॅक व कपडे घेऊन गेली आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक गणेश मोकाशी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### डिजिटल शिक्षणावर भर

**कोर्लई** : अलिबाग तालुक्यातील नागाव केंद्राची शिक्षण परिषद आक्षी येथे संपन्न झाली. या परिषदेत विविध शैक्षणिक सत्रांद्वारे अध्यापनाची गुणवत्ता वृद्धिंगत करण्यावर भर देण्यात आला. यावेळी प्राची बावकर यांनी कविता गायनामुळे विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम सोदाहरण स्पष्ट केला. निपुण अभियान अंतर्गत गणित विषयाशी मैत्री या विषयावर विविध गणित पेटीतील साहित्यांचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होणारा परिणाम रवींद्र भोईर स्पष्ट केले. पाचवी शिष्यवृत्ती भाषा मार्गदर्शन डॉ. संदीप वारगे यांनी विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त गुण मिळविण्यासाठी कोणता सराव आवश्यक आहे हे सांगितले. तसेच त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा अनुभव मांडला, त्यांनी पीएम ई-विद्या चॅनलची माहिती देत केलेले कार्यशाळा मार्गदर्शन सत्रातील विशेष आकर्षण ठरले.सर्व शिक्षक व पालक लिंकवरून पीएमई विद्या चॅनल डाऊनलोड करू शकतात याचा फायदा घरबसल्या आपल्या पाल्याला शैक्षणिक व्हिडिओ दाखवू शकतात. https://play.google.com/store/apps/detailsid=gov.in असून अधिक माहितीसाठी डॉ. वारगे यांच्या ९२७२६९८९२४ या क्रमांकावर संपर्क साधावा असे कळविण्यात आले आहे. सीमा नागावकर यांनी आभार प्रदर्शन केले व भारत गौरवगीताने परिषद यशस्वीरीत्या सागंता झाली.

### टिएमसी कॉलेजमध्ये शिष्यवृत्ती वाटप

**माणगाव** : माणगाव येथील जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये सोमवार (दि.२५) ऑगस्ट रोजी शिष्यवृत्ती वाटप राज्याचे माजी उद्योग मंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते करण्यात आली.



यावेळी पहिल्या टप्प्यातील एकूण ६० विद्यार्थ्यांनी प्रत्येकी दोन हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. शिवाजी मंदिर दादर व सरस्वती एज्युकेशन ट्रस्ट मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती वाटप केली जाते. शिष्यवृत्ती दिली जाते. सदर कार्यक्रमास नानासाहेब सावंत, रामदास पुराणिक, प्राचार्या डॉ. अमृता देशमुख, प्रा. हर्षल जोशी, प्रा.अशोक मोरे, प्रा. नितीन मुटकुळे, डॉ.जगदीश शिगवण, प्रा. भारत पवार, प्रा. सायगावकर, प्रा. अमित बाकाडे व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **मालाडे, अलिबाग-रोहा या रस्त्यालगत** (१५ एकर) ६०० गुंठे शेत जमीन रुपये तीन लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १२४ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२
- **श्रीगाव, अलिबाग येथे शेत जमीन** २३० गुंठे, रुपये ४ लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक २७७ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२
- **वरसोली, अलिबाग येथे शहरालगत** १०० गुंठे शेत जमीन रुपये २० लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १७३ लगत)सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२
- **जन्नावार हॉस्पिटल अलिबाग मध्ये** कामासाठी मावशी व नर्सची जागा आहे. (Vacancy) Contact No 7798034509

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांनी मौजे- नागाव, ता.अलिबाग, जि. रायगड येथील श्रीमती. निलांबरी नंदकुमार नाईक वगैरे २, रा. नागाव, अलिबाग यांच्या खुद्द मालकीची खालील वर्णनाची बागायत जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे - नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग १६४ क्षेत्र ०-०५-०० हे.आर. + पो.ख. ०-०१-०० हे. आर, एकूण क्षेत्र ०-०६-०० हे. आर. आकार रु. १.२५ पैसे ही बागायत जमीन मिळकत व या मिळकतीमधील ग्रुप ग्रामपंचायत नागाव घर मिळकत १) मालमत्ता क्रमांक २३३६, क्षेत्र ५१३ चौ. फुट, व २) मालमत्ता क्रमांक २३९९, क्षेत्र ९०० चौ.फुट

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजाविरहित विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास, आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ०७ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :-अलिबाग
दिनांक :- २५/०८/२०२५

सही/-
**ॲड. ऋग्वेद अविनाश ठाकूर**
रा. ५/३, आत्माराम नगर
अलिबाग- रायगड
मोबा. नं. ९८५००९०१०३

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ३५/२०२५-२०२६(मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पोलादपूर येथील सावित्री धरणाच्या पाणलोट क्षेत्रात स्वयंचलित पर्जन्यमापक स्टेशनचा पुरवठा करून स्थापना करणे व चाचणी घेऊन कार्यान्वित करणे.(दुसरी मागणी) | ₹१६,३४,०००.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक २६/०८/२०२५ ते दिनांक ०४/०९/२०२५ पर्यंत :https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक २८/०८/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०१/०९/२०२५ पासून नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.


ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या मौजे बामणगांव, ता. अलिबाग येथील मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अनु. | मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|---|
| १. | बामणगांव | ३७० | ०-०६-०० पो.ख. ०-०२-०० = ०-०८-०० | ०.२५ | १) श्री. राजेंद्र पुरुषोत्तम वाईकर. |
| २. | बामणगांव | ३७१ | ०-३४-०० पो.ख. ०-१५-०० = ०-४९-०० | १.३७ | २) श्री. सचिन सुरेश म्हात्रे. |
| ३. | बामणगांव | ३४१ | ०-१८-०० पो.ख. ०-०६-०० = ०-२४-०० | ०.७८ | ३) श्री. विलास मारुती गायकवाड. |

सदरच्या सर्व मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिल्यांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती ह्या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यामध्ये कुणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क अधिकार नाही, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २५/०८/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९४२२३७५११५

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही येथे लिखित **अनुसूची**मधील तक्त्याच्या स्तंब ए मध्ये अधिक विशेषत: वर्णन करण्यात आलेल्या जमिनीच्या सर्व त्या तुकडया आणि खंडाच्या (**"जमीन"**) संबंधित हक्क, शिर्षक, हिस्सा आणि हितसंबंधाबाबत येथे लिखित **अनुसूची**मधील तक्त्याच्या स्तंब बी मध्ये नमूद केलेल्या व्यक्तींच्या (एकत्रितपणे, **"मालक"**) मालकी हक्कांची चौकशी करीत आहोत.

त्यानुसार, जमीन किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये मालकांचे हक्क, शिर्षक, हिस्सा किंवा हितसंबंधाविरुद्ध किंवा संदर्भात कोणाही व्यक्तींचा कोणताही दावा असल्यास, याच्या पुढे किंवा अंतर्गत कोणत्याही विक्री, हस्तांतरण, नियुक्ती, भेट, विनिमय, भाडेपट्टी, परवानगी आणि परवाना, कुळ, ताबा, वापर, वहीवाट, विश्वस्त, देखभाल, सुविधाधिकार, संपादन, मागणी, विकसन अधिकार, विकास क्षमता वापरण्याचा अधिकार, एफएसआयचा वापर, मुखत्यारपत्र, प्रलंबित दावे, गहाण, धारणाधिकार, भार, गृहीतक (प्राप्तीच्या मार्गासह), तारण, हमी, कर्ज, ऋण, आगाऊ रक्कम, वारसा, योजना, वसीहत, विभाजन, तडजोड, किंवा कोणत्याही कॉर्पोरेट स्ट्रक्चरिंग किंवा रीस्ट्रक्चरिंग (कोणत्याही विलीनीकरण, डिमर्जर, दिवाळीखोरी, लिक्विडेशन, किंवा अन्यथा सह), किंवा कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा, महसूल किंवा वैधानिक प्राधिकरणाचा किंवा लवादाचा कोणत्याही जप्ती, मनाई हुकूम, डिक्री, आदेश, निर्णय, किंवा निवाडा अंतर्गत किंवा कोणत्याही करार, सामंजस्य करार, टर्म शीट आणि/किंवा इतर कोणताही डीड किंवा दस्तऐवज (एकतर कोणत्याही खटल्यात आव्हान दिलेले किंवा अन्यथा) अंतर्गत किंवा जमिनीच्या संदर्भात किंवा संबंधित कोणताही दावा किंवा मागणी असल्यास, जो मालकांचे हक्क, शिर्षक किंवा हितसंबंधा प्रतिकूल किंवा विसंगत असल्यास किंवा जरी इतर कोणतेही अधिकार, शिर्षक, मागणी, दावा किंवा हितसंबंध असल्यास, त्यांनी याद्वारे आम्हाला आमचे कार्यालय खैतान ॲण्ड कंपनी, वकिल, वन वर्ल्ड सेन्टर, टॉवर–१सी, १३वा मजला, ८४१ सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री. देवेंद्र देशमुख यांना लक्षवेधासाठी चिन्हांकीत करुन) या ईमेल वर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या कालावधीत ज्याच्या आधारावर असे दावे, मागणी किंवा हक्क केले जात आहेत अश्या सर्व कागदोपत्रांच्या प्रतींसहीत लिखीत स्वरुपात कळविणे आवश्यक आहे, अन्यथा असे गृहीत धरले जाईल की असे कोणतेही दावे, मागण्या किंवा अधिकार अस्तित्वात नाहीत आणि/किंवा ते दावे, जर असतील तर, ते माफ केले गेले आहेत आणि/किंवा सोडुन दिले गेले आहेत आणि ते आमच्या अशिलांवर बंधनकारक नाहीत.

### येथे वर संदर्भित अनुसूची

रायगड नोंदणी जिल्हयात आणि खालापूर नोंदणी उपजिल्हयात जिल्हा रायगड, तालुका खालापुर, गाव तुपगाव येथे स्थित आणि वसलेले खालील तक्त्यामधील अनुक्रमांक १ ते ८ मध्ये अधिक सविस्तरपणे वर्णन केलेल्या गट क्रमांकाचे ८ जमिनीच्या तुकडयांचा समावेश असलेले एकूण मोजमापीत ४५,२१० चौरस मिटर्स सर्व ते जमिनीचे आणि भूभागाचे तुकडे आणि खंड सोबत सर्व सुविधा हक्क, वारसा हक्क, उपभोग्य वस्तू, प्रवेश, निर्गमन, पूरक, आनुषंगिक आणि परिणामी हक्कांसहीत.

| | (ए) | | (बी) |
|---|---|---|---|
| अनु क्रमांक | गट क्रमांक | क्षेत्रफळ(चौरस मिटर्समध्ये) | मालक (7/12 नुसार नावे) |
| १. | ४/३/सी | ५,०८० | रेगन इन्फ्राकॉन एलएलपी तर्फे योगेश पोपटलाल ठक्कर |
| २. | ९/१ | ५,५२० | |
| ३. | १० | ६,९३० | |
| ४. | ९/२ | १,११० | मेसर्स निसर्गराज डेव्हलपर्स कंपनी तर्फे त्यांचे भागीदार (i) योगेश पोपटलाल ठक्कर, (ii) दिनेश देवीलाल जैन (छाजेर), (iii) प्रदिप नाथालाल ठक्कर (दत्तानी) आणि (iv) राजेंद्र सहेजराम जेसवानी |
| ५. | १२ | १२,२२० | |
| ६. | १७/५ | २,०९० | |
| ७. | ११ | ९,४३० | मेसर्स निसर्गराज डेव्हलपर्स कंपनी तर्फे त्यांचे भागीदार (i) योगेश पोपटलाल ठक्कर, (iii) प्रदिप नाथालाल ठक्कर (दत्तानी) आणि (iii) राजेंद्र सहेजराम जेसवानी |
| ८. | १४ | २,८३० | |

आज दिनांक २६ ऑगस्ट २०२५

**खैतान ॲन्ड कंपनी करीता**
सही /–
**देवेंद्र देशमुख**
**भागीदार**

नि: १६/५
अर्जदारांतर्फे वकील -श्री.अमित म.देशमुख
प्रोबेट अर्ज नं.१९६/२०२४

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.यांचे न्यायालयात**

श्री.अनिकेत अनंत पवार वगैरे १ — अर्जदार

**विरूद्ध**

सौ.लता काशिनाथ दसुरे — सामनेवाला

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळवण्यात येते की, कै.इंदिरा रमेश कातकर रा.गोंधळपाडा पो.वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड यांचा मृत्यु दि.२९.०७.२०२३ रोजी झाला असुन मृत्युपूर्वी कै. इंदिरा रमेश कातकर यांनी त्यांचे अंतिम मृत्युपत्र दि.२७.०६.२०२३ रोजी केले आहे. सदरचे मृत्युपत्र दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र.२६५९/२०२३ कडे नोंदवण्यात आलेले आहे. सदर मृत्युपत्राचे सत्यतेबाबत अर्जदार यांनी मा.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो अलिबाग यांचे न्यायालयात प्रोबेट अर्ज केला असुन तो सुनावणीकरता मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अलिबाग यांचे न्यायालयात वर्ग करण्यात आलेला आहे. मृत्युपत्राचा विषय असलेल्या कै. इंदिरा रमेश कातकर यांच्या खुद्द मालकीच्या मिळकतींचे विवरण पुढीलप्रमाणे आहे.

**ए) स्थावर मिळकत-जमिन**

मौजे गोंधळपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व त्याचा उपविभाग क्रमांक २/अ/१/६, क्षेत्र ०.९०.०० हे.आर.चौ.मी आकार रू.९०.००/-(अक्षरी रू. नव्वद मात्र) या बिनशेती मिळकतीवरील ग्रामपंचायत वेश्वी घर क्र.२७४अ ही घर मिळकत.

**बी) जंगम मिळकती-मुदतबंद ठेवी**

तिरुमाला तिरूपती मल्टीस्टेट को-ऑ. क्रेडीट सोसायटी लि.
शाखा वावे, ता.अलिबाग, जि.रायगड.
मधील ठेवींची माहिती पुढीलप्रमाणे

| अ. क्र. | खाता क्रमांक | एलएफ क्र. | रक्कम रूपये | नॉमीनीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | १६१००००००१४ | २३६९३० | ५०००००/- | नलिनी नंदकुमार साळवी |
| २ | ६१००००००१२ | २३६९२८ | ५०००००/- | दिपाली दिलीप बेंद्रे |
| ३ | ६१००००००१३ | २३६९२९ | ५०००००/- | लता काशिनाथ दसुरे |
| ४ | ६१०००००००५ | ३२६८४३ | २०००००/- | अनिता अनंत पवार |
| ५ | ६१०००००००६ | ३२६८४२ | १०००००/- | अनिता अनंत पवार |

सदर मृत्युपत्राचे सत्यतेबाबत प्रोबेट मिळण्यासाठी अर्जदारांनी मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदाराचे मागण्यांप्रमाणे कै.इंदिरा रमेश कातकर यांचे उपरोक्त मृत्युपत्राबाबत अर्जदारांचे लाभात प्रोबेट देण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा दि.२५/०९/२०२५ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहुन आपली हरकत कळवावी.

वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदारांस त्यांचे मागणीप्रमाणे कै.इंदिरा रमेश कातकर यांचे उपरोक्त अंतिम मृत्युपत्राबाबत प्रोबेट देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येवुन मे.कोर्ट प्रोबेट देण्याचा हुकूम करेल याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज दि.२२/०८/२०२५ रोजी माझे सहिनीशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**(लिपीक)** — **दिवाणी न्यायालय क.स्तर अलिबाग**
**(अधिक्षक)** — **दिवाणी न्यायालय व स्तर अलिबाग**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री.प्रविण पांडुरंग पाटील २) श्री.रोशन राजेंद्र पाटील दोघेही रा.सहाण, पो.बामणगाव ता.अलिबाग, जि.रायगड यांचेकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन.क्र.व उपविभाग नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| कावीर ता.अलिबाग | २२४ | ०-२५-६० पो.ख ०-०२-०० = ०-२७-६० | ६-५६ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. २५-०८-२०२५.

सही/-
**ॲड.आर.बी.कोसमकर**
चिरायु, ब्राम्हणआळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड.

## अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात

**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड**

क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र.२२३/२०२५

१ श्री.संदेश धोंडू टेंभे — **अपिलार्थी**
रा.कल्याण, मुरबाड रोड, मु.नवगाव, बापसई, ठाणे - ४२१३०१

**विरुद्ध**

१ श्रीम.मोहिनी दिपक छाब्रिया तर्फे अखत्यारी
श्री.तलत अब्बास सय्यद
रा.६०१, सहावा मजला, ए एल जे रेसिडेन्सी,
पाली नाका, बांद्रा प, मुंबई - ४०००५२
२ श्री.सचिन वामन शेळके
रा.डी विंग, रुम नं.१४, सूर्यकुंड महापुरुष हौ.सोसायटी,
गंधपावडर रोड, डॉकयार्ड रोड, माझगाव, मुंबई - ४०००१०
३ श्री.भरतकुमार वालचंद जैन
रा.गोकुळ टाऊनशीप, रुम नं.ए-१, पोपेटा हौसिंग सोसायटी लिमिटेड
डी-३, रुम नं.४, राम मंदिराजवळ, विरार प, मुंबई
४ इम्रान तुफेल शेख — **- उत्तरार्थी**
५ तुफेल अहमद शेख मयत
५/१ इम्रान फूल अहमद शेख
रा.ब्लॉक नं.७०३, बिओ प्राईड को.ऑप.हौ.सोसायटी लिमिटेड,
जंक्शन ऑफ हिल रोड ॲण्ड आईस फॅक्टरी रोड, हिल रोड,
बांद्रा प, मुंबई ४०० ०५०
५/२ रुबीना जावेद खान
५/३ इरफान मोहमद उमर खान
रा.ब्लॉक नं.९, १०, दुसरा मजला, सिफीन अपार्टमेंट, आंबेडकर रोड,
एल आय सी कॉलनी समोर, बांद्रा प, मुंबई - ४०००५०
५/४ शाजीया नईम खान
रा.१४०२, नेक्स्ट ॲव्हेन्यू, २९ वा रस्ता, सिगडी हॉटेलच्या पुढे,
बांद्रा प, मुंबई-४०० ०५०
५/५ श्रीम. नाझीया फैजल जाफरी
रा.२०२ जल सागरीका को.ऑप.हौ.सोसायटी,
रिझवी कॉम्प्लेक्स जवळ, बांद्रा, मुंबई - ४०००५०

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये**

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, माले, ता.कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं.२३/१७ क्षेत्र ०-१७-० हे आर. आकार ०.१७, २३/१८/अ क्षेत्र ०-४०-० हे.आर. आकार ०.४०, २३/१८ ब क्षेत्र ०-३६-० आकार ०.२७, २६/६ ब क्षेत्र ०-३७-६ हे.आर. आकार २.२४ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी कर्जत यांचेकडील आरटीएस अपील क्र.९४/२०२४, दि.०३/०४/२०२५ मधील आदेशाविरुद्ध या न्यायालयाकडे अपील दाखल केलेले आहे सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये दि. २९/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग हे सुनावणी घेणार असून सदरची सुनावणी अपर तहसिलदार पनवेल यांचे कार्यालय, खोली क्रमांक ३०७, प्रशासकीय भवन, आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके ऑडीटोरीयन समोर, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे आले आहे तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आणि हजर न राहिल्यास आपले गैरहीरीत प्रकरणामध्ये सुनावणी होऊन आदेश दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २५/०८/२०२५

सही/-
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करीता**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बेलवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दर्शन जितेंद्र झवेरी यांच्याकडून आमच्या अशिलांनी कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बेलवली | १३६ | ०-३३-०० पो.ख.०-०३-०० = ०-३६-०० | १.९४ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, अदलाबदल, कुळवहिवाट, कसवणुक या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, तसेच सदर मिळकत कराराने खरेदी घेणेस योग्य आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व सदर हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत, असे समजणेत येईल, हे सर्वांस कळावे.

ता.२६/८/२०२५

सही /-
**ॲड. माधवी नारायण ठाकूर**
सी-३०१, 'क्लिफ हेवन'
को.ऑप.हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

दिनांक : २६ ऑगस्ट २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र चौ. मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) जगमोहन सिंग पुतवानी<br>२) जसमीत सिंग पुतवानी | ५२/१ | ११२ | १८० | १८ | ०० |
| | त्या वरील बांधलेला बंगला त्याचे क्षेत्र ९४.०१ चौरस मीटर कारपेट इतके आहे | | | | |
| | ५२/१ | ११३ | १७५ | १७ | ५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/ -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो.नं.९१५८२७७७२८
दिनांक :-२६/०८/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्री. कमलाकर तातु मिणमिणे यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे तांबस, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे. आर. | आकारणी रु.पै |
|---|---|---|---|
| ३७ | १ | ०-५३-२० यापैकी खरेदी देणार यांचे मालकीचे ०-१५-२२ पो.ख ०-१-७८ एकुण ०-१७-० | ०-२६ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : २६/०८/२०२५

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम.कॉम.एल.एल. बी.
पत्ता: दहिवली, ए. व्ही. एफ. रेसिडेन्सी,
ललानी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.देवेंद्र मधुकर काळसेकर, रा.१६, ईराणी मेन्शन, गोखले एज्युकेशन सोसायटी लेन, आर.एम.भट शाळा लेन, परेल, मुंबई, ४०००१२, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पोशिर, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ७९/३ | ०.२३.०० पो.ख. ०.०२.०० | ०.२५ | श्री.अशोक भवरलाल छाजेड |
| | एकुण ०.२५.०० | | |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २६/०८/२०२५.

सही / -
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे
मो.नं.७३८५००४८०६.

## सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल यांचे कार्यालय

कार्यालयीन पत्ता- कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, ए विंग, पहिला मजला, सहकार नगर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये जाहीर नोटीस**

जा.क्र.- सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत कलम १०१/
कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग,
प्रतीक गार्डन, गाळा नं ३४ सेक्टर ३४, कामोठे, पनवेल ४१०२०९

**विरुद्ध**

अनुक्रमांक १ ते १९

खालील दर्शविलेल्या जाब देणार यांना नोटीस देण्यात येते की, थकीत कर्जाविषयी अर्जदार संस्थेने दाखल केलेल्या वसुली अर्जाबाबत आपले म्हणणे सादर करणेसाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती, खालील नमूद थकबाकीदार यांना थकीत कर्जाविषयी संस्थेने या कार्यालयात दाखल केलेल्या दि.१६/०६/२०२५ रोजीच्या अर्जाबाबत तुमचे म्हणणे दाखल करण्यासाठी या कार्यालयात वेळोवेळी विहित कार्यपद्धतीने नोटीसा पाठवून सुनावण्या घेण्यात आल्या. परंतु जाब देणार प्रतिवादी कर्जदार व जामिनदार यांना नोटीस तामील होऊन देखील सुनावणीस हजर राहिले नाहीत तसेच अनु क्र.१२ व १८ हे सुनावणीस हजर राहिलेले आहेत, ज्यांना अद्याप पर्यंत हि नोटीसा मिळालेल्या नाहीत अशा कर्जदार/जामिनदार यांना सदर कलम अन्वये व नियमाखाली अंतिमरित्या सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास आपले म्हणणे दाखल करण्यासाठी, अंतिम शेवटची संधी देण्यात येत असून दि.१५/०९/२०२५ रोजी ११.३० वाजता आपण स्वतः अथवा अधिकृत व्यक्ती/वकीलामार्फत कार्यालयात हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास आपले काही म्हणणे नाही असे गृहीत धरून अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची आपण गांभीर्याने नोंद घ्यावी.

| अ. क्र. | जाब देण्याचे नाव | अर्ज दाखल दि. | दावा क्रमांक | दावा रक्कम | जमीनदार क्र.१ | जमीनदार क्र.२ | जमीनदार क्र.३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.भिमराव गुलाब भोसले | १६/०६/२०२५ | २७६/२०२५ | ५३,९७३/- | श्री.सुनिल सोन भोसले. | श्रीम.नयना श्रीधर सावंत | ..... |
| २ | श्री.योगेश गोविंद सूर्यवंशी. | १६/०६/२०२५ | २७७/२०२५ | ६५,५२०/- | श्री.दिपक दत्ताराम मोरे. | श्री.कृष्णा भास्कर मोढवे | |
| ३ | श्री दिलीप शांताराम शिर्के. | १६/०६/२०२५ | २७८/२०२५ | ३०,९९७/- | श्री.रमेश भिकाजी कांबळे. | श्री सचिन शांताराम शिर्के. | |
| ४ | सौ स्नेहल संतोष देसाई. | १६/०६/२०२५ | २७९/२०२५ | ७५,२००/- | श्री प्रशांत बबन भोर. | श्री वसंतराव बापूराव देसाई | |
| ५. | श्री.चेतन गणेश गोवारी. | १६/०६/२०२५ | २८०/२०२५ | ६४,६१२/- | श्री. अजय अनंत भगत. | श्री.राकेश राजेश सुराते | |
| ६. | श्री.केतन विश्वनाथ कोळी. | १६/०६/२०२५ | २८१/२०२५ | ८३,३२७/- | श्री.अभिजित मनोहर पाटील. | श्री पलविंदर सिंग फुल | |
| ७ | श्री.अमोल रमेश राऊत | १६/०६/२०२५ | २८२/२०२५ | ८४,९७९/- | श्री संतोष दामू पवार | श्री बाजीराव धोंडीराम सूर्यवंशी | |
| ८. | श्री.समीर सुरेश शिरधनकर | १६/०६/२०२५ | २८३/२०२५ | ८९,१४६/- | श्री. वसंत धर्मा जाधव | श्री. समीर कमलाकर कांबळे | |
| ९ | सौ.स्वाती संतोष मोहिते | १६/०६/२०२५ | २८४/२०२५ | १,००,४४०/- | श्री. राजेश पारसमल बदलमिया जैन | श्री. सुहास गोविंद कदम | |
| १० | श्री.कृष्णा भास्कर मोढवे | १६/०६/२०२५ | २८५/२०२५ | १,०४,३९८/- | श्री.दिपक दत्ताराम मोरे | श्री.प्रदीप विलास महाडिक | |
| ११ | श्री. दत्तात्रय धनाजी फडतरे | १६/०६/२०२५ | २८६/२०२५ | १,१५,२२६/- | श्री. वैशाली अशोक अहिरे | श्री अनिकेत प्रताप फदाणे | |
| १२ | श्री.सनी संदीप कदम | १६/०६/२०२५ | २८७/२०२५ | ६७,३९८/- | श्री. संजय धोंडीराम पवार | श्री. देवानंद नारायण कांबळे | |
| १३ | श्री.संदीप गुलाब तुपे | १६/०६/२०२५ | २८८/२०२५ | १,२३,२७२/- | श्री. सागर शांताराम चंद्रगोरे | श्री. रमेश रामचंद्र लोंढे | |
| १४ | श्री.उपेंद्रसिंग राजपाल पार्चे | १६/०६/२०२५ | २८९/२०२५ | १,०९,२५४/- | श्री जितेंद्र राजपाल पार्चे | श्री. मुकेश सावन वाघेला | |
| १५ | श्री.शैलेंद्र रामफल शहा | १६/०६/२०२५ | २९०/२०२५ | १,३९,१०६/- | श्रीमती नागिमुनिया अब्दुल शेख | श्री.प्रदीप प्रकाश पाते | |
| १६ | श्री भारत श्रीधर शिरधनकर | १६/०६/२०२५ | २९१/२०२५ | १,३५,१६७/- | श्री. शुभम परशुराम म्हात्रे | श्री शकुंतला वसंत जाधव | |
| १७ | श्रीमती शकुंतला वसंत जाधव | १६/०६/२०२५ | २९२/२०२५ | ९३,५९८/- | श्री भारत श्रीधर शिरधनकर | श्री दत्ता रूपसिंग राठोड | श्री.वसंत धर्मा जाधव |
| १८ | सचिन तानाजी घाडगे | १६/०६/२०२५ | २९३/२०२५ | २,१९,८५१/- | श्री. संतोष शांताराम साळुंक | श्री. नितीन प्रभाकर चौधरी | |
| १९ | नेहा जमील अखत्तर शेख | १६/०६/२०२५ | २९४/२०२५ | १,३३,२८६/- | फरजाना इद्रिस शेख | अश्विनी राजेंद्र पाटील. | |

हि नोटीस आज दि.२१/०८/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

जा. क्र. २३३९
स्थळ- पनवेल
दिनांक- २९/०८/२०२५

सही/-
**(भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल यांचे कार्यालय**

# निवडक

## ड्रीम ११चं 'पॅक-अप'

**नवी दिल्ली :** जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट बोर्ड अशी ओळख असणाऱ्या बीसीसीआयला सध्या एका वेगळ्याच समस्येला तोंड द्यावे लागत आहे. बीसीसीआय आणि ड्रीम ११ यांच्यातील व्यवसायिक संबंध संपुष्टात आले आहेत. ऑनलाइन गेमिंगचे प्रमोशन आणि रेग्युलेशन विधेयक मंजूर झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. ड्रीम इलेव्हनशी संबंध तोडल्यानंतर बीसीसीआयनेही एक मोठा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया म्हणाले की, आता भविष्यात पुन्हा कधीही अशा कंपन्यांशी व्यवसायिक संबंध जोडणार नाही किंवा काम करणार नाही. दरम्यान, आशिया कपच्या तोंडावर टीम इंडियाचा स्पॉन्सर असलेला ड्रीम११ दूर झाल्याने नवा स्पॉन्सर कोण? हा प्रश्न उभा आहे.ड्रीम११ आणि भारतीय क्रिकेट नियाम क मंडळ २०२३ मध्ये जोडले गेले होते आणि दोघांमधील करार २०२६ पर्यंत होता. ड्रीम११ ला २०२६ पर्यंत बीसीसीआयला ३५८ कोटी रुपये द्यावे लागले होते, परंतु आता हा करार मध्येच मोडला गेला आहे. त्यामुळे बीसीसीआयला मोठा तोटा सहन करावा लागला आहे. बीसीसीआयचे माय११सर्कलशीही व्यवसायिक संबंध आहेत. ही कंपनी आयपीएलमध्ये एक फँटसी पार्टनर आहे. ही कंपनी एका वर्षात बीसीसीआयला दरवर्षी १२५ कोटी रुपये देते. पण ही कंपनीदेखील ऑनलाइन गेमिंगशी संबंधित असल्याने या कंपनीवरही गदा येऊ शकते. टीम इंडियाच्या जर्सीवर कोणाचे नाव असेल याचे उत्तर लवकरच मिळू शकेल. कारण रिपोर्ट्सनुसार, अनेक मोठ्या कंपन्या बीसीसीआयसोबत करार करण्यास तयार आहेत. यामध्ये टाटा, रिलायन्स, अदानी सारखी मोठी नावे समाविष्ट आहेत. टाटा आधीच आयपीएलचे प्रायोजक आहेत, तर रिलायन्स जिओ प्रसारणात सहभागी आहे. या कंपन्यांव्यतिरिक्त, ग्रो, झिरोधा यासारख्या कंपन्यादेखील करार करू शकतात. महिंद्रा आणि टोयोटा सारख्या मोठ्या ऑटोमोबाईल कंपन्या देखील बीसीसीआयसोबत त्यांचे व्यवसायिक संबंध जोडू शकतात. तसेच, पेप्सीदेखील या शर्यतीत असल्याचे म्हटले जात आहे.

## भारताचा कसोटी सामन्यात पराभव

**नवी दिल्ली :** राधा ठाकुर हीच्या नेतृत्वात वूमन्स टीम इंडिया ए ऑस्ट्रेलिया दौऱ्याचा शेवट विजयाने करण्यात अपयशी ठरली आहे. ऑस्ट्रेलिया ए वूमन्स टीमने भारताच्या महिला ब्रिगेडवर ४ दिवसांच्या अनऑफिशियल टेस्ट मॅचमधील अंतिम दिवशी ६ विकेट्सने शानदार विजय मिळवला. याआधी ऑस्ट्रेलियाने भारताचा टी २० मालिकेत ३-० अशा फरकाने धुव्वा उडवला होता. तर भारताने एकदिवसीय मालिका २-१ अशा फरकाने आपल्या नावावर केली होती. मात्र एकमेव कसोटी सामन्यात भारतीय संघाला विजय मिळवता आला नाही. भारताने पहिल्या डावात सर्वबाद २९९ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाने प्रत्युत्तरात ऑलआऊट ३०५ पर्यंत मजल मारली आणि ६ धावांनी नाममात्र आघाडी घेतली. भारताला दुसऱ्या डावात २८६ धावाच करता आल्या. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला २८१ धावांचं आव्हान मिळालं. ऑस्ट्रेलियाने हे आव्हान ४ विकेट्सच्या मोबदल्यात सहज पूर्ण केलं. ऑस्ट्रेलियाने ८५.३ ओव्हरमध्ये २८४ धावा केल्या आणि हा सामना जिंकला.ऑस्ट्रेलियासाठी दुसऱ्या डावात कॅप्टन ताहिला विल्सन हीने ४६ धावांची निर्णायक खेळी केली. तर रेचल ट्रेनान हीने अर्धशतक ठोकलं. रेचलने ६४ धावा केल्या. तसेच मॅडी डार्क हीने ६८ रन्स केल्या.

## शाकिब अल हसन बनला जगातील नंबर १ खेळाडू

**ढाका :** बांगलादेशचा अनुभवी खेळाडू शाकिब अल हसनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. पण अजूनही जगभरातील टी-२० लीग स्पर्धांमध्ये त्याच्या अष्टपैलू कामगिरीचा बोलबाला पाहायला मिळतो. सध्या तो वेस्टइंडिजम ध्ये सुरू असलेली कॅरेबियन प्रीमियर लीग स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरला आहे. या स्पर्धेतील ११ व्या सामन्यात खेळताना त्याने बारबुडा संघाकडून गोलंदाजी करताना ३ गडी बाद केले. यासह त्याने मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. या स्पर्धे तील ११ वा सामना सेंट किट्स अँड नेव्हिस पेट्रियट्स आणि बारबुडा या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात गोलंदाजी करताना त्याने नवीन बिदेसी, काइल मेयर आणि मोहम्मद रिझवान यांना बाद करत माघारी धाडलं. हे ३ गडी बाद करताच त्याने टी-२० क्रिकेटमध्ये ५०० गडी बाद करण्याचा पराक्रम केला आहे. यासह तो टी-२० क्रिकेटमध्ये ५०० गडी बाद करणारा आणि फलंदाजीत ७००० धावांचा पल्ला गाठणारा पहिलाच क्रिकेटपटू ठरला आहे. या सामन्यात गोलंदाजीला येण्यापूर्वी शाकिबच्या नावे टी-२० क्रिकेटमध्ये ४९९ गडी बाद करण्याची नोंद होती. या सामन्यात गोलंदाजी करताना १ गडी बाद करताच त्याने टी-२० क्रिकेटमध्ये ५०० गडी बाद करण्याचा पल्ला गाठला. या सामन्यात त्याने ३ गडी बाद केले.

---

आशियाई नेमबाजी स्पर्धा

# भारत अव्वल स्थानी

## अद्रियानने आशियाई विक्रम रचला; ऐश्वर्यने जिंकले सुवर्णपदक

**। कझाकस्तान । वृत्तसंस्था ।**

कझाकस्तानमधील शिमकेंट येथे सुरू असलेल्या १६ व्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत (रायफल/पिस्तूल/शॉटगन) पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन (३) वैयक्तिक प्रकारात भारताच्या ऐश्वर्य प्रताप सिंग तोमरने रविवारी (२४ ऑगस्ट २०२५) सुवर्णपदक जिंकले. त्याने अंतिम फेरीत ४६२.५ गुण मिळवले. याशिवाय, भारताच्या एड्रियन कर्माकरने ज्युनियर पुरुषांच्या ३ पी मध्ये ४६३.८ गुणांसह सुवर्णपदक आणि आशियाई ज्युनियर विक्रम प्रस्थापित केला. तर वेदांतने कांस्यपदक जिंकले.





अंतिम सामन्यात ऐश्वर्यने सुरुवातीपासूनच आघाडी घेतली. पहिल्या पाच शॉट्सनंतर (गुडघ्याच्या स्थितीत) आघाडी घेतली आणि नंतर तो आपली आघाडी मजबूत करत राहिला. १३ व्या शॉटनंतर, झाओ आणि ऐश्वर्यामध्ये फक्त ०.३ गुणांचा फरक होता, परंतु ऐश्वर्यने १४ व्या शॉटमध्ये १०.८ गुण मिळवून एका गुणापेक्षा जास्त आघाडी मिळवली, जी शेवटपर्यंत कायम राहिली. त्याने ०.५ गुणांच्या फरकाने सुवर्णपदक जिंकले. जपानच्या नाओया ओकाडा (४४८.८) ने कांस्यपदक जिंकले, तर चैन सिंग (४३५.७) आणि अखिल शेओरन (४२४.९) अनुक्रमे चौथ्या आणि पाचव्या स्थानावर राहिले.

तिन्ही भारतीय नेमबाज अंतिम फेरीसाठी पात्र ठरले

पुरुषांच्या ३ पी स्पर्धेत, तिन्ही भारतीय नेमबाजांनी अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवली. ऐश्वर्य ५८४ गुणांसह तिसरे स्थान मिळवत सर्वोच्च पात्रता गुण मिळवले. अनुभवी नेमबाज चैन सिंग ५८२ गुणांसह पाचव्या स्थानावर राहिला, तर जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक विजेता अखिल शेओरन ५८१ गुणांसह सातव्या स्थानावर राहिला. तिन्ही चिनी नेमबाजांनीही अंतिम फेरी गाठली, तर जपान आणि कोरियाचा प्रत्येकी एक नेमबाज अंतिम फेरीसाठी पात्र ठरला. तथापि, भारत सांघिक सुवर्णपदकापासून वंचित राहिला. भारताचा एकूण गुण १७४७ होता, जो चीनच्या १७५० पेक्षा तीन गुण कमी होता.या स्पर्धेत ऐश्वर्यचे हे दुसरे सुवर्णपदक आहे. त्यांने एक रौप्य आणि एक कांस्यपदक देखील जिंकले आहे. चीनच्या झाओ वेन्यूने रौप्य आणि जपानच्या नाओया ओकाडाने कांस्यपदक जिंकले.

### पदकतालिकेत भारताचे वर्चस्व

**आतापर्यंत, भारताने या स्पर्धेत २५ सुवर्ण, १० रौप्य आणि १० कांस्य पदके जिंकून पदकतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे. चीन १० सुवर्ण पदकांसह दुसऱ्या स्थानावर आहे.**

ज्युनियर पुरुषांच्या रायफल ३ पोझिशनमध्ये भारताला दोन पदके मिळाली. अद्रियानने सुवर्णपदक जिंकले आणि वेदांतने कांस्यपदक जिंकले. अंतिम फेरीत अद्रियानने शानदार सुरुवात केली. पहिल्या १५ शॉट्स (गुडघे टेकण्याची स्थिती) नंतर त्याने चीनच्या हान यिनानवर ०.९ गुणांची आघाडी घेतली. यावेळी वेदांत सहाव्या स्थानावर होता. दुसऱ्या स्थानावर (प्रोन) १० शॉट्स मारल्यानंतर, वेदांतने पुनरागमन केले आणि तो अद्रियानपेक्षा फक्त ०.४ गुणांनी मागे होता. त्यानंतर अद्रियानने आपली आघाडी १.४ गुणांपर्यंत वाढवली आणि अंतिम स्टँडिंग पोझिशनमध्ये आपली प्रभावी कामगिरी सुरू ठेवली.

स्टँडिंग पोझिशनमध्ये, वेदांत एकेकाळी यजमान नेमबाज ओलेग नोस्कोव्हपेक्षा मागे होता, परंतु त्याने पुनरागमन केले. दुसरीकडे, अद्रियानने केवळ सुवर्णपदक जिंकले नाही तर शेवटच्या पाच शॉट्समध्ये १०.८, १०.२, १०.४, १०.५ आणि १०.५ गुण मिळवून आशियाई ज्युनियर विक्रमही प्रस्थापित केला. चीनच्या हान यिनानने शेवटच्या शॉट्समध्ये वेदांतला हरवून रौप्यपदक जिंकले. वेदांतला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

ज्युनियर पुरुषांच्या ३ स्पर्धेत, भारताचा वेदांत वाघमारेने ५८२ गुणांसह पात्रता फेरीत दुसरे स्थान पटकावले तर एड्रियन कर्माकरने ५७६ गुणांसह पात्रता फेरीत आठवे आणि शेवटचे स्थान पटकावले. इतर भारतीय नेमबाज सामी उल्ला खान (५७५), रोहित कन्यान (५७५), गौरव देसले (५६९) आणि हितेश श्रीनिवासन (५६४) पात्रता फेरीत स्थान मिळवू शकले नाहीत. तथापि, वेदांत, एड्रियन आणि रोहित या त्रिकुटाने ज्युनियर सांघिक स्पर्धेत एकूण १७३३ गुणांसह सुवर्णपदक जिंकले.

---

# आरडीसीए जिल्हास्तरीय पंच परीक्षा संपन्न

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने शनिवारी (दि.२३) पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावरील स्टेडियम हॉल येथे जिल्हास्तरीय क्रिकेट पंच परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते,त्याला रायगड जिल्ह्यातील ३० पंच परीक्षेसाठी बसले होते.



गेले ७५ दिवस ऑनलाईन व प्रत्येक्ष कार्यशाळा वर्गाच्या माध्यमातून जिल्ह्यातील क्रिकेट पंचांना मार्गदर्शन दिले जात आहे.माजी रणजी ट्रॉफी खेळाडू व विद्यमान बीसीसीआयचे पंच हर्षद रावले, एमसीएचे पंच राजन कसबे व आरडीसीएचे मार्गदर्शक व क्रिकेट नियमांचे तज्ञ नयन कट्टा यांनी पंचांना बहुमूल्य मार्गदर्शन केले आहे.पंच परीक्षेपूर्वी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी उपस्थित सर्व पंचांना मार्गदर्शन केले यावेळी त्यांनी जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या कामाची माहिती दिली,गतवर्षी आरडीसीएच्या वतीने मुला-मुलींच्या सर्व वयोगटातील स्पर्धेचे आयोजन केले असून सर्व मिळून जवळपास ३२५ सामन्यांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते सर्व सामन्यांसाठी रायगड जिल्ह्यातील होतकरू पंचांनी भूमिका चोख बजावल्या बद्दल त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले. रायगड जिल्ह्यात चांगल्या दर्जाचं पंच व गुणलेखक तयार व्हावेत ह्यासाठी आरडीसीएच्या वतीने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

एमसीए तर्फे आयोजित केल्या गेलेल्या सोळा वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेतील १५ सामने यावर्षी रायगड जिल्ह्यात घेण्यात आल्या होत्या त्याचे यशस्वी आयोजन आरडीसीए तर्फे करण्यात आले.यावर्षी एमसीएच्या जास्तीत जास्त मॅचेस रायगड जिल्ह्यात घेण्याचा आपला प्रयत्न असणार असल्याचे अनिरुद्ध पाटील यांनी यावेळी सांगितले. पंच परीक्षा लेखी, प्रात्यक्षिक व तोंडी प्रकारात घेण्यात आली. जिल्हा पॅनल परीक्षेसाठी परीक्षक म्हणून बीसीसीआयचे पंच हर्षद रावले, एमसीएचे पंच राजन कसबे, क्रिकेट नियमाने तज्ञ नयन कट्टा, महाराष्ट्र पंच पॅनलचे ॲड.पंकज पंडित, विघ्नहर्ता मुंढे, सागर मुळे, रोहन पाटील, वरूण म्हात्रे, प्रशांत माळी यांनी परिश्रम घेतले.

---

# किंग कोहली परत येतोय

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टीम इंडियाचा माजी कर्णधार विराट कोहली सध्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटपासून दूर आहे. कोहलीने २०२५ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला स्पर्धेचे विजेतेपद मिळवून दिले. त्यानंतर तो क्रिकेटच्या मैदानावर खेळताना दिसलेला नाही. पण टी २० आणि कसोटीतून निवृत्त झालेला कोहली आता मात्र पुन्हा एकदा मैदानात घाम गाळताना दिसतोय.यावर्षी ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ऑस्ट्रेलियात होणाऱ्या तीन वनडे सामन्यांच्या मालिकेत तो सहभागी होण्याची शक्यता आहे.



भारत आणि ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेचा पहिला सामना १९ ऑक्टोबर रोजी पर्थमध्ये खेळला जाईल. त्यानंतर उर्वरित दोन एकदिवसीय सामने २३ ऑक्टोबर (अडलेड) आणि २५ ऑक्टोबर (सिडनी) रोजी दोन्ही संघांमध्ये खेळले जातील. कोहलीने ऑस्ट्रेलिया दौऱ्याची तयारी सुरू केली असून लंडनच्या लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर त्याचा जोरदार सराव सुरू आहे. विराट कोहलीने लॉर्ड्स क्रिकेट मैदानाबाहेर चाहत्यांसोबत फोटो काढले.अलिकडेच विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्तीबद्दल अनेक चर्चा सुरू झाल्या आहेत, परंतु भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) हे वृत्त फेटाळून लावले आहे. बीसीसीआयचे म्हणणे आहे की, खेळाडूने स्वतः त्याच्या भविष्याचा निर्णय घ्यावा.

---

# अर्शदीप सिंह खास कामगिरीसाठी सज्ज

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघ आशिया कप मोहिमेतील आपला पहिला सामना १० सप्टेंबरला ओमान विरुद्ध खेळणार आहे. या स्पर्धेत भारताचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंह याला अविस्मरणीय कामगिरी करण्याची संधी आहे. अर्शदीपने आतापर्यंत भारतासाठी टी २० सामन्यांमध्ये निर्णायक भूमिका बजावली आहे. त्यामुळे अर्शदीप आशिया कप स्पर्धेत विशेष असं करुन दाखवणार का? याकडे क्रिकेट चाहत्यांचं लक्ष असणार आहे.



या स्पर्धेत अर्शदीप व्यतिरिक्त अफगाणिस्तानचा कर्णधार राशीद खान याला वर्ल्ड रेकॉर्ड ब्रेक करण्याची संधी आहे. राशीदला सर्वाधिक टी २० विकेट्स घेण्याचा विश्व विक्रम आपल्या नावावर करण्याची संधी आहे.

अर्शदीपला आशिया कप स्पर्धेत विकेट्सचं शतक पूर्ण करण्याची संधी आहे. अर्शदीपने आतापर्यंत टी २० कारकीर्दीत ९९ विकेट्स घेतल्या आहेत. त्यामुळे अर्शदीपला खास शतकासाठी १ विकेटची गरज आहे.

---

# क्रिकेटपटूचा रस्ते अपघातात मृत्यू

**। नवी दिर्ली । वृत्तसंस्था ।**

आयुष्यात कधी काय होईल, याचा कोणालाही अंदाज नसतो. मृत्यू कधी येईल आणि आपल्याला आपल्या प्रियजनांपासून दूर करेल, हे कोणीही सांगू शकत नाही. असाच काहीसा प्रकार जम्मू-काश्मीरमध्ये एका क्रिकेटरसोबत घडला आहे. हा क्रिकेटर शांतपणे आपल्या मार्गावर जात होता, तेव्हा अचानक काहीतरी घडले आणि या खेळाडूचा मृत्यू झाला. हा घटनेचा अक्षरशः काळीज पिळवटून टाकणारा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. जम्मू-काश्मीरमधील पूंछ जिल्ह्यात राहणाऱ्या क्रिकेटर फरीद हुसैन याचा रस्ते अपघातात मृत्यू झाला आहे.

---

# रोहा तालुका शालेय कराटे स्पर्धा उत्साहात



स्पर्धेत ८५ खेळाडूंचा सहभाग

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ व तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा तालुका शालेय कराटे स्पर्धा उत्साहात पार पडल्या. तालुका कराटे स्पर्धेत ८५ खेळाडूंनी सहभाग घेतला. शुक्रवारी धाटाव क्रीडा संकुलात ही स्पर्धा पार पडली. कराटे स्पर्धेचे उद्घाटन उद्योजक महेश बामुगडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी रोहा तालुका समन्वयक रविंद्र कान्हेकर,ऑल इंडिया मिक्स बॉक्सिंग संस्थापक अध्यक्ष राकेश म्हसकर, सहसमन्वयक सुधीर जंगम, अमित दळवी, गोविंद कवलगे, प्रशांत मोहिते, विनायक सकपाळ, मुकेश भगत, सौरभ मेस्त्री, संजय सकपाळ, सिद्धी सकपाळ, धृती लाड, समिता वाघमारे, ऋतुजा पवार आदींसह खेळाडू उपस्थित होते.

या स्पर्धेला भरभरून प्रतिसाद मिळाल्याने आयोजकांनी आनंद व्यक्त केला. तालुका स्तरावर कराटे खेळ घेतल्याने सर्व खेळाडू व पालकांनी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांचे आभार मानले. तसेच सर्व विजेत्या खेळांडूना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### सुवर्णपदक विजेते

- १४ वर्षे मुले, अतुल लोंडे, साईराज करंजे,रामभाऊ श्रीयोग,प्रीत भायतांडेल,दिव्य शुक्ला,संभव भायतांडेल,अनुप दिघावकर,आदीत्य हशीळकर.
- १४ वर्षे मुली- आराध्या कासार, परी महाडिक, गौरी पाटील, स्वालिहा फकीर, अभिज्ञा अंभोरे,
- १७ वर्षे मुले- अमर सलागरे, युगात शिंदे, हरी तेलंगे,हरिद्ध जैन,प्रीत माळी,ओम कासार, पियुष परमार.
- १७ वर्षे मुली- आर्या कासार, नेहा डोरे, शुभ्रा आठवले.
- १९ वर्षे मुले- अथर्व देवरे, शिवशांत सर्जे, आदित्य पालांडे.
- १९ वर्षे मुली- प्राची सिन्हा यांना सुवर्ण पदक देऊन गौरविण्यात आले..

---

सॅमसनचा केरळ क्रिकेट लीगमध्ये झंझावात | प्रतिस्पर्धी संघातील गोलंदाजांची जोरदार धुलाई

# आशिया कपआधी ४२ चेंडूत स्फोटक शतक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशिया कप २०२५ स्पर्धेसाठी बीसीसीआय निवड समितीने १९ ऑगस्टला १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. आशिया कप स्पर्धेला ९ सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. तर भारतीय संघ आशिया कप मोहिमेतील आपला पहिला सामना हा १० सप्टेंबरला यूएई विरुद्ध खेळणार आहे. या स्पर्धेसाठी विकेटकीपर फलंदाज संजू सॅमसन यालाही संधी देण्यात आली आहे. आशिया कप स्पर्धेसाठी अजून २ आठवडे बाकी आहेत. मात्र त्याआधी संजूने आपण आशिया कप स्पर्धेसाठी सज्ज असल्याचं जाहीर केलं. संजूने केरळ क्रिकेट लीग २०२५ स्पर्धेत स्फोटक शतक ठोकत सर्वांचं लक्ष वेधून घेतलंय.



केरळ क्रिकेट लीग २०२५ स्पर्धेत एकूण ६ संघात २१ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान एकूण ३३ टी २० सामने खेळवण्यात येणार आहेत. संजू सॅमसन या स्पर्धेत कोची ब्लू टायगर्सकडून खेळत आहे. संजूने या स्पर्धेतील आठव्या सामन्यात एरीज कोल्लम सेलर्स विरुद्ध खणखणीत शतक ठोकलं. विशेष म्हणजे संजूने विजयी धावांचा पाठलाग करताना ही खेळी केली.

एरीज कोल्लम सेलर्सने संजूच्या संघासमोर २३७ धावांचं आव्हान ठेवलं होतं. ओपनिंगला आलेल्या संजूने वादळी सरुवात केली. संजूने प्रतिस्पर्धी संघातील गोलंदाजांची जोरदार धुलाई केली आणि अवघ्या १६ चेंडूत अर्धशतक पूर्ण केलं. संजूने अर्धशतकानंतर अवघ्या २६ चेंडूत पुढच्या ५० धावा पूर्ण केल्या. संजूने अशाप्रकारे शतक पूर्ण केलं. संजूने या शतक खेळीत १३ चौकार आणि ५ षटकार झळकावले. आशिया कप स्पर्धेआधी संजूचं शतक भारतीय संघासाठी चांगले संकेत तर दुसऱ्या संघांसाठी धोक्याची घंटा आहे.

संजूला शतकाचं आणखी मोठ्या खेळीत रुपांतर करण्याची संधी होती. मात्र संजूला तसं करता आलं नाही. संजू शतकानंतर आणखी फक्त २१ धावाच करु शकला. संजूने १२१ धावा केल्या. संजूने ५१ बॉलमध्ये २३७.२५ च्या स्ट्राईक रेटने १२१ रन्स केल्या. संजूने या दरम्यान ७ सिक्स आणि १४ फोर लगावले.

संजू १९ व्या ओव्हरमधील पहिल्या बॉलवर आऊट झाला. संजू आऊट झाल्याने केरळ ब्लू टायगर्सचा स्कोअर ५ आऊट २०६ झाला. मात्र त्यानतंर मुहम्मद आशिक याने चाबूक खेळी केली. कोचीने हा सामना शेवटच्या चेंडूवर जिंकला.

पंधरावे स्मृतीदिन



कै. गजानन प्रभाकर म्हात्रे
मृत्यू दि. : २६/०८/२०१०
शोकाकुल : मुलगा : श्री. उमेश गजानन म्हात्रे, पत्नी, मुली, सुना.
मु. मुळेखंड-तेलीपाडा, पो. उरण-रायगड

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)